



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०३ ● अंक : ०७८ ● पुणे ● रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313


# नवीनच 'खाकी पॅटर्न'!

## आरोपींची धिंड काढून न्याय देण्याचा अधिकार पोलिसांना कुणी दिला?

● धिंड काढणे, गुडघ्यावर चालायला लावणे, सार्वजनिक अपमान... हा न्यायप्रक्रियेचा भाग की कायद्याचा भंग? ●

**प्रतिक गंगणे (दै. आरंभ पर्व)**

शहरात वाढत्या गुन्हेगारीवर अंकुश लावण्यासाठी पुणे पोलिसांनी गेल्या काही वर्षांपासून 'खाकी पॅटर्न' नावाची नवी पद्धत राबवण्यास सुरुवात केली आहे. घरफोडी, वाहनतोडी, कोयत्याच्या जोरावर दहशत, खून, लुबाडणे याप्रकरणी अटक केलेल्या आरोपींना रस्त्यावरून फिरवणे, धिंड काढणे, गुडघ्यावर चालायला लावणे, बेड्या घालून परेड घेणे असे प्रकार सामान्य झाले आहेत. हे व्हिडीओ वारंवार सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

मात्र, कायदा अशा कृत्यांना परवानगी देत नाही. आरोपीला न्यायालयात नेण्यापूर्वीच सार्वजनिक ठिकाणी अपमानित करणे म्हणजे पोलिसांनी थेट शिक्षा देण्यासारखे आहे. त्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. गुन्हेगारांवर प्रतिबंध बसतोय का? की उलट गुन्हेगारी मानसिकता वाढण्यासच हातभार लागतोय?

न्यायव्यवस्थेचे मूलभूत तत्त्व सांगते - दोष सिद्ध होईपर्यंत प्रत्येक आरोपी निर्दोष. त्यामुळे आरोपींची धिंड काढणे म्हणजे न्यायालयाच्या अधिकारात हस्तक्षेपच. सुप्रीम कोर्ट आणि मानवाधिकार आयोगाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की, कोणत्याही आरोपीचा सार्वजनिक अपमान करणे बेकायदेशीर आणि असंवैधानिक आहे.

नवीन फौजदारी प्रक्रिया संहितेतील (BNSS) कलम 43(4) मध्ये स्पष्ट नमूद आहे की, अटक करताना कायदेशीर मर्यादा पाळणे अनिवार्य आहे.

**पोलिसांचे अधिकार :** आरोपीला अटक करणे वैद्यकीय तपासणी करणे न्यायालयात हजर करणे यापलीकडे शिक्षा देण्याचा अधिकार पोलिसांकडे नाही. धिंड काढण्याचा ट्रेंड असतानाही पुण्यात खून, चोरी, लुबाडणे, चाकू-कोयत्यांचा दहशतवाद, दरोडे यांचे प्रमाण कमी झाल्याचे चित्र दिसत नाही. उलट अशा घटना दिवसाढवळ्या घडताना दिसतात.

- पोलिसांना आरोपीचा अपमान करण्याचा अधिकार कुणी दिला?
- गुन्हे थांबत नाहीत, मग 'धिंड पॅटर्न'चा परिणाम काय?
- हा न्याय व्यवस्थेवरील हस्तक्षेप नाही का?



### मानवी हक्कांचे उल्लंघन

- मानवाधिकार आयोगाने स्पष्ट केले आहे.
- आरोपीची धिंड काढणे बेकायदेशीर
- पोलिस न्यायाधीशाची भूमिका घेऊ शकत नाहीत
- पूर्वी अशा कृत्यांबद्दल दंडही ठोठावण्यात आला आहे

### एक नजर पुण्यातील धिंड प्रकरणांवर

- डिसेंबर 2022 : सिंहगड कॉलेज परिसरातील दहशत प्रकरणात आरोपींची धिंड.
- जानेवारी 2023 : खुनाच्या कटातील आरोपी रस्त्यावर फिरवले.
- जुलै 2023 : कर्वे रस्ता, नाना पेठ, कोंढवा परिसरात विविध टोळ्यांची परेड.
- नोव्हेंबर 2025 : बारमध्ये लूट करणाऱ्या टोळीची धिंड.

### "लोकांचा आत्मविश्वास वाढतो"

काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे- आरोपींना रस्त्यावर फिरवल्याने नागरिकांच्या मनात धीर निर्माण होतो. पोलिसांप्रती विश्वास वाढतो. मात्र हा कायद्याबाहेरील उपाय समाजात दहशत निर्माण करण्याबरोबरच न्यायव्यवस्थेवरील प्रश्नचिन्ह वाढवतो, असा ट्रेंड कायदेतज्ज्ञ सांगतात.

मग 'धिंड' काढण्याचा उद्देश काय? हा प्रश्न नागरिक, कायदेतज्ज्ञ आणि सामाजिक संघटना उपस्थित करत आहेत.

अनेक आरोपी धिंड काढली जाताना मारहाण झाल्याचे न्यायालयात सांगत नाहीत. पोलिसांचेच दबाव असतो, अशी वकिलांची तक्रार.

"काही बोलले तर वैद्यकीय तपासणी, चौकशी, नवी केस लागू शकते म्हणून आरोपी गप्प राहतात."

ॲड. असीम सरोदे म्हणतात- "धिंड काढणे म्हणजे आरोपीला सामाजिक मृत्युदंड देण्यासारखे आहे. तो गुन्हा सिद्ध होण्याआधीच दोषी ठरतो."

ॲड. विजयसिंह ठोंबरे म्हणतात- "अशा वागणुकीमुळे आरोपी पुन्हा गुन्हेगारीकडे ढकलला जातो. हा मानवी मूल्यांचा भंग आहे."

**कायद्यानुसार निष्कर्ष**

- आरोपी दोषी ठरविण्याचा अधिकार फक्त न्यायालयाचा
- पोलिसांचे काम : अटक, पुरावे, चौकशी, न्यायालयात सादरीकरण
- धिंड काढणे हा कायद्याचा भंग, मानवाधिकारांचा अपमान







## ठळक बातम्या

### पुण्यात स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील पिंपरी चिंचवडमधून एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. स्पा सेंटरच्या नावाखाली चालणाऱ्या सेक्स रॅकेटवर पोलिसांनी छापा टाकला आहे. छापा टाकून पोलिसांनी सात तरूणींची सुटका केली आहे. पोलिसांना गुप्त माहितीच्या आधारे देह विक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाली होती. याच माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकला. सध्या पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे. ही घटना पिंपरी चिंचवड येथील पिंपळे सौदागर येथील आयकॉन बिल्डिंगमधून उघडकीस आली. शॉप नंबर २०१ आणि २०४ या ठिकाणी द औरा थाई स्पा सुरू आहे. या स्पामध्ये अवैध कारभार सुरू होता. स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवण्यात येत होता. देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड पोलिसांनी धाड टाकली. या वेश्या व्यवसायावर पिंपरी-चिंचवड शहर पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने धाड टाकत कारवाई केली आहे. तसेच पोलिसांनी द औरा थाई स्पा सेंटरचे मालक अभिजीत लॉरेन्स (वय वर्ष ३०) याच्याविरोधात सांगवी पोलीस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला. पोलिसांनी देहविक्रीचा व्यवसायावर धाड टाकल्यानंतर अवैध वस्तू जप्त केले.







# रोहित राऊत ठरले भारताचे पहिले आय- पॉपस्टार

## ॲमेझॉन एमएक्स प्लेयरतर्फे पहिला ब्लॉकबस्टर सीझन सादर




**कलाकाराला प्रथम प्राधान्य, ओरिजनल ट्रॅक्सवर भर, भारतातील आघाडीच्या पॉप गायकांकडून मार्गदर्शन अशी वैशिष्ट्ये असलेल्या आय- पॉपस्टारच्या पहिल्या सीझनची सांगता झाली. हा शो स्वतंत्र संगीतासाठी मुख्य प्रवाहातील महत्त्वाचा शो ठरला. गीतलेखन, वैयक्तिक ठसा आणि स्टेजवरचं सादरीकरण यांना महत्त्व देणाऱ्या या शो ने नव्या पिढीच्या कलाकारांना त्यांच्या शैलीनुसार प्रसिद्धी मिळवण्यास मदत केली. कोलॅबरेशन नव्या उंचीवर नेत ॲमेझॉन एमएक्स प्लेयरनं वॉर्नर म्युझिक आणि स्पॉटिफाय ची म्युझिक पार्टनर म्हणून निवड करत अनोखी सांगीतिक पर्वणी दिली आहे. आय- पॉपस्टारचे सर्व एपिसोड्स ॲमेझॉन एमएक्स प्लेयर, मोबाइल, कनेक्टेड टीव्हीज, ॲमेझॉन शॉपिंग ॲप, प्राइम व्हिडिओ, फायर टीव्ही आणि एयरटेल एक्स्ट्रीमवर मोफत स्ट्रीम होत आहेत.**

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
सहा अविस्मरणीय आठवडे आणि तब्बल 85 ओरिजनल ट्रॅक्सनंतर देशभरात नव्या, स्वतंत्र पॉप आवाजांची लाट आणणाऱ्या ॲमेझॉन एमक्स प्लेयरवरील आय- पॉपस्टारच्या पहिल्या सीझनची सांगता झाली. भारतातील म्युझिक रिअलिटी शोजमधे नवा मापदंड प्रस्थापित करणाऱ्या या शो ची सांगता एका दिमाखदार अंतिम फेरीसह करण्यात आली. प्रेक्षकांचा अभूतपूर्व प्रतिसाद, सोशल मीडियावर गाजणारी नवी गाणी आणि एका रात्रीत स्टार बनणारे आर्टिस्ट यांच्यासह झालेल्या या अंतिम फेरीत अस्सल कला आणि भारतीय पॉप संगीताचा पुनर्जन्म साजरा करण्यात आला.

अंतिम फेरीची सुरुवात स्पर्धकांनी स्टेजवर जबरदस्त परफॉर्मन्स सादर करत झाली. प्रत्येकाच्या आवाजातून भारताच्या या सर्वात मोठ्या स्टेजवर त्यांचा प्रवास उलगडला. चरण पथानिया यांनी कॉन्सर्ट- स्टाइलमधे आपला परफॉर्मन्स सादर करत अंतिम फेरीची दमदार सुरुवात केली. यावेळी गायिका राधिका भिडे यांनी आपला परफॉर्मन्स सादर करण्यापूर्वी मुनावर फारूकी यांनी त्यांची अनोखी ओळख करून दिली तो क्षण सर्वांसाठीच हृद्यस्पर्शी होता. त्यानंतर राधिका यांनी सर्वांसमोर, विशेषतः रत्नागिरीवरून आलेल्या आपल्या कुटुंबासमोर गायन सादर केलं. त्यानंतर मुनावर यांनी आपली एका नर्मविनोदी स्टँडअपमधून सर्वांचा मूड बदलला आणि त्याचवेळेस प्रिन्स नरूला खास पाहुणे म्हणून मेंटॉर्समधे सहभागी झाले. त्यांनी या शोला मिळत असलेल्या लोकप्रियतेचं भरभरून कौतुक केलं आणि आपल्या मुलीचा आय- पॉपस्टारमधल्या गाण्यांवर ताल धरत असतानाचा व्हिडिओही दाखवला. अंतिम स्पर्धकांनी त्यांचं सादरीकरण पूर्ण केल्यानंतर संपूर्ण भारत ज्या क्षणाची वाट पाहात होता, त्या क्षणासाठी स्टेज सज्ज करण्यात आलं.

टॉप 2 मधे टीम किंगचे रिषभ पांचाल आणि टीम पर्मिशचे रोहित राऊत यांचा समावेश होता. काही क्षणानंतर रोहित राऊत यांना पहिल्यावहिल्या आय- पॉपस्टारचा विजेता घोषित करण्यात आलं आणि 7,00,000 रुपयांचं बक्षिस प्रदान करण्यात आलं. रनर अप ठरलेल्या रिषभ पांचाल यांना 3,00,000 रुपयांचं बक्षिस मिळालं. दोघांना यावेळी केवळ बक्षिसंच नव्हे, तर देशभरात चाहतावर्गही मिळाला.

रोहित राऊत यांनी अतिशय भावनिक शब्दांत आपला प्रवास उलगडला. ते म्हणाले, 'आय- पॉपस्टारमधे मी कलाकार म्हणून स्वतःची वेगळी ओळख शोधायचा प्रयत्न केला आणि काही आठवड्यांनंतर आज मी विजेतेपदी उभा आहे. या विजेतेपदानं मला माझ्या कलेचा पाठपुरावा करण्यासाठी आत्मविश्वास दिला आहे. मी माझे मेंटॉर परमिश पाजी यांचा आभारी आहे. त्यांच्याशिवाय आणि अर्थातच माझ्यावर विश्वास दाखवणाऱ्या चाहत्यांशिवाय हे शक्य झालं नसतं. हा पुरस्कार मी आपल्या चौकटीबाहेर पडून गुणवत्ता सिद्ध करण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक प्रादेशिक कलाकाराला अर्पण करतो. सरतेशेवटी ॲमेझॉन एमएक्स प्लेयरनं माझ्यासारख्या स्वतंत्र कलाकाराला हा प्लॅटफॉर्म उपलब्ध करत गुणवत्ता दर्शवण्याची आणि लाखो लोकांपर्यंत पोहोचण्याची संधी दिल्याबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो.'

# पिरामल फायनान्स महाराष्ट्रात विस्तार

## FY28 पर्यंत देशभरात एकूण ₹1.5 लाख कोटी AUM साध्य करण्याचे लक्ष्य





**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पिरामल फायनान्स लिमिटेडने आज महाराष्ट्रभर मोठ्या विस्ताराची घोषणा केली असून आर्थिक वर्ष 2028 पर्यंत एकूण 1.5 लाख कोटी रुपये AUM गाठण्याचे चे लक्ष्य ठेवले आहे. महाराष्ट्र पिरामल फायनान्ससाठी सर्वात मोठ्या बाजारपेठांपैकी एक असून नाशिक, नागपूर, पुणे आणि कोल्हापूरसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये 77 शाखांच्या मदतीने 1,21,000 हून अधिक ग्राहकांना सेवा पुरवली जाते. राज्यात गृहकर्जे आणि बिझनेस लोन्ससाठी विशेषतः मोठी मागणी दिसून येत आहे.

कंपनीने आपल्या प्रमुख मोहिमेच्या पुढील टप्प्याचे अनावरणही केले 'हम काग़ज़ से ज़्यादा नीयत देखते हैं, ज्यामध्ये भारतभरातील कुटुंबे आणि लहान उद्योजकांच्या आकांक्षा अधोरेखित करणारी तीन नवीन फिल्म्स समाविष्ट आहेत.

पिरामल फायनान्सचे रिटेल एयूएम 75,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले असून चार वर्षांत साडेतीन पट वाढ नोंदवली आहे. कंपनीचे आर्थिक वर्ष 2026 च्या अखेरीस 1,00,000 कोटी रुपयांचे उद्दीष्ट आहे. उत्सव काळात रिटेल वितरणात 45 टक्क्यांची वाढ झाली, जी गृहकर्ज, वैयक्तिक आणि व्यवसाय कर्जासाठी उपनगरी बाजारातून मिळालेल्या मागणीमुळे झाली आहे. आर्थिक वर्ष 2026 च्या पहिल्या सहामाहीत 32 टक्के वाढ नोंदवली गेली. कंपनी डिजिटल सोल्यूशन्स आणि वैयक्तिक सेवांचा समन्वय साधणाऱ्या आपल्या "हाय टेक अँड हाय टच" मॉडेलच्या माध्यमातून विस्तार सुरू ठेवत आहे.

जगदीप मल्लारेड्डी, सीईओ – रिटेल लेंडिंग, पिरामल फायनान्स यांनी सांगितले, "सशक्त आणि वेगाने विस्तारत असलेल्या रिटेल फ्रँचायझीसह देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या एनबीएफसी पैकी एक म्हणून, महाराष्ट्रासारख्या बाजारपेठांमध्ये मोठी संधी आम्हाला दिसते. उपनगरी आणि उदयोन्मुख बाजारपेठा आमची वाढ वेगाने पुढे नेत आहेत, आणि आमचे लक्ष साधे, पारदर्शक आणि विश्वासार्ह क्रेडिट सोल्युशन्स देण्यावर आहे, विशेषतः अशा ग्राहकांना ज्यांच्याकडे नेहमीच पारंपरिक दस्तावेज नसतात.

## न्युरोसर्जिकल व इंटरव्हेन्शनल शस्त्रक्रिया यशस्वी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
वेळेवर केलेला हस्तक्षेप आणि बहुविषयक वैद्यकीय सेवांचे उत्कृष्ट उदाहरण ठरवत, मेडिकव्हर KLE हॉस्पिटल, पुणे येथील तज्ज्ञ टीमने गंभीर सब-ॲरॅक्नॉइड हेमरेज (SAH) झालेल्या 60 वर्षीय महिलेचे प्राण यशस्वीरीत्या वाचवले. बेशुद्ध अवस्थेत दाखल झालेल्या या रुग्णावर आपत्कालीन न्युरोसर्जिकल क्लिपिंग, अत्याधुनिक न्युरोइंटरव्हेन्शनल थेरपी आणि सर्वसमावेशक क्रिटिकल केअर यांचे संयोजन करून उपचार करण्यात आले, ज्यामुळे रुग्ण पूर्णपणे बरी झाली. रुग्ण पूर्वी पूर्णपणे निरोगी होती आणि कोणतीही साथरोग स्थिती नव्हती. तिला सुरुवातीला सोलापूरमधील रुग्णालयात बेशुद्ध अवस्थेत दाखल करण्यात आले आणि पुढील उच्चस्तरीय उपचारांसाठी मेडिकव्हर KLE हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले.

## कंतारच्या भारतातील मोस्ट व्हॅल्युएबल ब्रॅन्ड्स २०२५ मध्ये एचडीएफसी बँक ठरली १ल्या क्रमांकाची संस्था

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँकेला देशातील सर्वाधिक मुल्यवान ब्रॅन्ड म्हणून कंतार ब्रॅन्डझ टॉप १०० मोस्ट व्हॅल्युएबल इंडियन ब्रॅन्ड्स रिपोर्ट मध्ये मानांकन प्राप्त झाले आहे. हे मुल्यांकन बँकेच्या डिजिटल नाविन्य आणि ग्राहकाभिमुख अशा योजनांविषयीच्या वचनबद्धतेमुळे प्राप्त झाले आहे.

एचडीएफसी बँकेची ब्रॅन्ड व्हॅल्यू ही २०२४ मध्ये ३८.३ बिलियन डॉलर्स होती ती १८ टक्क्यांनी वाढून ४४.९ बिलियन डॉलर्सवर पोहोचली आहे. २०१४ मध्ये पहिल्यांदा प्रकाशित करण्यात आलेल्या ब्रॅन्ड्स इंडिया रिपोर्ट च्या तुलनेत ३७७ टक्के इतकी आहे. बँकेला हे पहिल्या क्रमांकाचे मुल्यांकन १२ वर्षांपासून सातत्याने सुरु असलेल्या रिपोर्ट्स पैकी ८ वेळा मिळाले आहे.

कंतारच्या संपादकीय लेखात ते नमूद करतात "एचडीएफसी बँकेची वाढ ही सातत्यपूर्ण नाविन्य आणि नवीन तंत्रज्ञानात गुंतवणूक करुन ग्राहकांचा अनुभव समृध्द केल्याने झाली असून यामध्ये व्हिजिल आंटी सारख्या सुपर हिरो स्टाईल व्यक्तीमत्वाचा समावेश आहे, ही व्यक्ती वापरकर्त्यांना वित्तीय फसवणूकीपासून बचाव करण्यासाठी प्रशिक्षित करते. डिजिटल बँकिंग ला वाहून घेतल्यामुळे एचडीएफसी बँक सातत्याने भारतातील ब्रॅन्ड लीडरशिप साठी नवनवीन उच्च स्तर निर्माण करते."

या रँकिंग विषयी बोलतांना एचडीएफसी बँकेचे ग्रुप हेड (ब्रॅन्ड,रिटेल मार्केटिंग अँन्ड कस्टमर ॲनेलिटिक्स) आणि चीफ मार्केटिंग ऑफिसर श्री रवी संथानम यांनी सांगितले "देशातील सर्वोत्कृष्ट ब्रॅन्ड म्हणून मान्यता मिळाल्या बद्दल आम्ही खूपच आनंदी आहोत. आमच्यासाठी आमच्या तत्वांशी खरे राहणे, ग्राहकांच्या समस्या सोडवणे आणि ग्राहकांचा अनुभव समृध्द करुन सुरक्षा आणि विश्वसनीयता निर्माण करणे हा आमचा मंत्र आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळापासून आम्ही ग्राहकांना केंद्रस्थानी ठेऊन त्या सातत्याने बदलणाऱ्या गरजांवर लक्ष केंद्रित करण्यावर मार्गक्रमण केले आहे. आमच्या मोहिमासुध्दा ग्राहकांमध्ये सुरक्षित बँकिंग पध्दतींचा प्रसार आणि जागरुकता यां विषयी तयार केल्या आहेत. या मान्यतेतून बँकेच्या कर्मचाऱ्यांचे कष्ट अधोरेखित होतात." कंतार ब्रॅन्डझ तर्फे ग्राहकाभिमुख दृष्टिकोनासह आर्थिक मुल्य (ब्रॅन्डच्या मालमत्तेला जोडलेले कॉर्पोरेट उत्पन्न) आणि ब्रॅन्डचे योगदान (मागणीची शक्ती, किंमतीची शक्ती आणि भविष्यातील शक्ती यांचे योगदान) यांचा वापर केला जातो.

## हिमोग्लोबिन विकारांच्या निदानासाठी एचपीएलसी मशिन कार्यान्वित




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
केईएम हॉस्पिटल येथे नुकतेच एचपीएलसी व्हेरिएंट 2 हे मशिन कार्यान्वित करण्यात आले आहे. ही अद्ययावत निदान प्रणाली फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि.तर्फे दान करण्यात आली असून यामुळे हिमोग्लोबिन विकार व थॅलेसेमियाच्या निदान सेवांना अधिक बळकटी मिळेल. हिमोग्लोबिनचे विकार हे भारतात एक गंभीर सार्वजनिक आव्हान असून यामुळे अनेक नवजात शिशू,मुले,किशोरवयीन मुली व गर्भवती महिलांवर याचा प्रभाव दिसून येतो. केईएम हॉस्पिटल पुणे येथील पॅथॉलॉजी विभाग गेली दोन दशके हिमोग्लोबिन इलेक्ट्रोफोरेसिस ही चाचणी परवडणाऱ्या दरात प्रदान करत आली आह,ज्यामुळे लवकर निदान आणि योग्य वेळेत व्यवस्थापन शक्य होत आले आहे. केईएम हॉस्पिटल पुणेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीन वाडिया म्हणाल्या की, एचपीएलसी व्हेरिएंट 2 मशिन प्रस्थापित होणे हा हिमोग्लोबिन विकारांविरूध्द आमच्या लढ्यातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

प्रगत तंत्रज्ञान आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि.च्या साहाय्यामुळे अधिक वेगाने, अचूक व परवडणाऱ्या दरात निदान व व्यवस्थापन सेवा प्रदान करण्यासाठी आम्ही अधिक सक्षम झालो आहोत.

## कॅसाग्रँडची १,००० कर्मचाऱ्यांना पूर्णपणे मोफत लंडन सहलीची भेट

- **ही सहल कंपनीच्या 'प्रॉफिट-शेअर बोनान्झा' पुरस्कार योजनेअंतर्गत आयोजित करण्यात आली होती.**

**चेन्नई (दै. आरंभ पर्व)**
आपल्या यशामध्ये कर्मचाऱ्यांना सर्वात महत्त्वाचे स्थान देणाऱ्या कार्यसंस्कृतीचे पालन करत, भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट डेव्हलपर्सपैकी एक असलेल्या कॅसाग्रँड कंपनीने आपल्या 1,000 कर्मचाऱ्यांना आठवडाभराची पूर्ण प्रायोजित लंडन सहल भेट देऊन आनंदित केले. ही सहल कंपनीच्या वार्षिक कर्मचारी पुरस्कार उपक्रम 'प्रॉफिट शेअर बोनान्झा' अंतर्गत आयोजित करण्यात आली होती.

या प्रॉफिट शेअर बोनान्झा उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत 6,000 हून अधिक कर्मचाऱ्यांनी सिंगापूर, थायलंड, मलेशिया, दुबई, स्पेन आणि इतर अनेक देशांमध्ये प्रवास केला आहे. अनेक कर्मचाऱ्यांनी या सहलींना त्यांच्या आयुष्यात बदल घडवणारे आणि प्रेरणा देणारे अनुभव म्हटले आहे. दरवर्षी हा उपक्रम अधिक मोठ्या प्रमाणावर राबवला जातो, कारण कंपनीला विश्वास आहे की तिचे यश कर्मचाऱ्यांमुळे शक्य आहे आणि त्यामुळे त्यांच्यासोबत हे यश खास पद्धतीने साजरे केले पाहिजे.

भारत आणि दुबईतील विविध कार्यालयांमधील कर्मचाऱ्यांना एकत्र आणत, लंडनची ही सहल त्यांच्या शहराच्या इतिहास, संस्कृती आणि आकर्षणाचा संस्मरणीय अनुभव देण्यासाठी तयार केली गेली आहे आहे. या सहलीत विंडसर कॅसलचा ऑडिओ गाईडेड टूर, कॅम्डन मार्केटच्या रंगीबेरंगी गल्लींचा अनुभव, आणि इंटरकॉन्टिनेंटल लंडन येथे भव्य गाला डिनर यांचा समावेश आहे. त्याचबरोबर कर्मचारी सेंट पॉल्स कॅथेड्रल, लंडन ब्रिज, बिग बेन, बकिंगहॅम पॅलेस, पिकॅडिली सर्कस, ट्राफल्गर स्क्वेअर आणि मॅडम तुसाद यांसारख्या प्रसिद्ध ठिकाणांनाही भेट देतील. सहलीचा शेवट थेम्स नदीवरील सुंदर क्रूजने होईल, ज्यातून लंडनचे मनमोहक दृश्य पाहता येईल आणि हा अविस्मरणीय अनुभव पूर्ण होईल. ही सहल अविस्मरणीय बनवण्यासाठी एक समर्पित टीम अनेक महिन्यांपासून काम करत होती. त्यांनी प्रमुख एअरलाइन्ससोबत भागीदारी करून आणि प्रत्येक ठिकाण काळजीपूर्वक निवडून, हे सुनिश्चित केले की कर्मचारी कोणत्याही पदाचा किंवा अनुभवाचा असला तरीही एकत्र प्रवास करतील, एकत्र राहतील आणि संपूर्ण सहलीत तितकाच उत्कृष्ट अनुभव घेतील.

श्री अरुण एमएन, फाउंडर आणि मॅनेजिंग डायरेक्टर, कॅसाग्रँड आपले विचार व्यक्त करताना म्हणाले, "दरवर्षी जेव्हा आपण आपल्या कर्मचाऱ्यांचा अशा खास पद्धतीने सन्मान करतो, तेव्हा कॅसाग्रँडची खरी ओळख अधोरेखित होते. आमचे कर्मचारी हेच आमच्या संस्थेचा आत्मा आहेत, आणि त्यांचा आनंद, आनंदाश्रू आणि भावनिक क्षण पाहून आम्हाला प्रचंड अभिमान वाटतो. आम्ही संपत्ती वाटण्यावर विश्वास ठेवतो, आणि आमच्या कर्मचाऱ्यांपैकी अनेकजण पहिल्यांदाच परदेशात प्रवास करताना पाहणे ही आमच्यासाठी मोठी आनंदाची गोष्ट आहे. अनेक जण पुन्हा हा आनंद घेत आहेत. आपले स्वप्न पूर्ण करताना, आठवणी तयार करताना आणि नवीन उर्जेसह परतताना पाहणे ही या परंपरेची सर्वात आनंददायक गोष्ट आहे." कॅसाग्रँडने वर्षानुवर्षे कर्मचाऱ्यांना प्रथम स्थान देणारी संस्कृती तयार केली आहे, जिथे प्रशंसा, सामायिक यश आणि दीर्घकाळ चालणाऱ्या प्रॉफिट-शेअर कार्यक्रम यावर भर दिला जातो. दहा वर्षांपूर्वी कठोर मेहनत करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी सुरू झालेला साधा उपक्रम आता देशातील सर्वात प्रशंसित कर्मचारी सन्मान उपक्रमांपैकी एक बनला आहे.

## 'औकात के बाहर'मध्ये प्रेम, महत्वाकांक्षा आणि कँपस पॉलिटिक्सचा टकराव




**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
ॲमेझॉनची मोफत व्हिडिओ स्ट्रिमिंग सेवा- ॲमेझॉन एमएक्स प्लेयरने आपला आगामी कँपस ड्रामा औकात के बाहर या हृदयस्पर्शी कथानकाची घोषणा केली आहे, जे आपल्याला कोलाहलाने भरलेल्या कँपस जीवनाच्या अस्सल जगात घेऊन जाते. दिल्लीच्या सजीव बॅकड्रॉपवर चित्रीत केलेला हा शो हसू, प्रेमभंग, कँपसमधली दुष्मनी आणि मॉर्डन रोमान्सचा मिलाफ आहे. कॉलेजमधील जीवनाच्या झळाळत्या एनर्जीत हा सामावून घेतो. एल्विश यादवचे प्रमुख भूमिकेतून पदार्पण होत असून औकात के बाहरमध्ये मल्हार राठोड, हेतल गाडा, निखील विजय आणि केशव साधना हे कलाकार देखील महत्वपूर्ण भूमिकांमधून आपल्या भेटीला येत आहेत. एल्विश यादव साकारत असलेल्या राजवीर अहलावतसोबत ट्रेलरची सुरुवात होते, राजवीर हा सफीदों, हरियाणाचा नम्र तरीही प्रखर व्यक्तीमत्वाचा मुलगा आपल्या अवाक्यापलिकडली स्वप्न पाहत दिल्लीच्या उच्चभ्रू कॉलेजमध्ये पाऊल ठेवतो. फ्रेशर पार्टीमध्ये त्याची थट्टा झाल्यावर, तो त्याची सिनियर अंतरा शुक्ला हिला (मल्हार राठोड द्वारे अभिनीत) इंप्रेस करण्यासाठी मागचा पुढचा विचार न करता पैज लावतो. अंतरा शुक्ला आत्मविश्वासू, राजनैतिक प्रभाव असलेली विद्यार्थिनी आहे, जी भावनांना आपल्यापासून मैलभर लांब ठेवते. अविचारी आव्हान लवकरच अधिकाधिक सखोल होत जाते, तसे राजवीरला अभिमान आणि भावनेच्या गुंत्यात अडकल्याचे जाणवू लागते आणि अंतराला ती महत्वाकांक्षा आणि आपुलकीमध्ये गुंतत असल्याचे लक्षात येते. कॉलेजमधले राजकारण आणि भावनात्मक मतभेद केंद्रस्थानी असलेला औकात के बाहर प्रतिमा आणि प्रतिभा, गर्व आणि असुरक्षिततेमधल्या कालातीत तणावाचा शोध घेतो.

# एअरटेलच्या व्यवस्थापकीय संचालक गोपाळ विठ्ठल यांचे पत्र

- **प्राथमिक बँक खात्यातून यूपीआय पेमेंट केल्याने डिजिटल फसवणुकीचा धोका वाढतो**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
भारतात मोठ्या प्रमाणात डिजिटल फसवणूकीच्या घटना उघडकीस आल्या आहेत. वाढत्या सायबर गुन्ह्यांचे केसेस पाहता भारती एअरटेलचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गोपाळ विठ्ठल यांनी या सततच्या वाढत्या गुन्ह्यांबद्दल चिंता व्यक्त केली. या घटना आटोक्यात येण्यासाठी एअरटेलकडून राबवल्या जाणा-या आवश्यक उपाययोजनांबद्दल माहिती देण्यासाठी ग्राहकांना उद्देशून त्यांनी पत्र लिहिले आहे. आजकाल बनावट पार्सल डिलीव्हरीचे कॉल, फिशिंग लिंक्स आणि डिजिटल अरेस्ट आदी घोटाळे मोठ्या प्रमाणात घडत असताना एअरटेल आपल्या ग्राहकांच्या सुरक्षेसाठी पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर त्यांनी एअरटेल पेमेंट्स बँकेच्या सेफ सेकंड अकाउंटची घोषणा केली. हे खाते ग्राहकांच्या मुख्य बँक खात्यापासून स्वतंत्र ठेवले जाते. यामुळे डिजिटल पेमेंटसाठी वापरण्यात येणारा पैसा सुरक्षित राहतो आणि कोणत्याही संभाव्य फसवणूकीपासून अतिरिक्त संरक्षण मिळते.

"एअरटेल नेटवर्कमध्ये होणारे गुन्हे किंवा फसवणूकीच्या घटना आमच्यासाठी मोठी चिंतेची बाब आहे. ग्राहकांची सुरक्षितता हेच आमचे कायमस्वरुपी प्राधान्य राहील.",असे एअरटेलचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गोपाळ विठ्ठल यांनी सांगितले. आपल्या ग्राहकांच्या डिजीटल देयकांच्या सुरक्षिततेसाठी एअरटेलकडून होणा-या उपाययोजनांचीही त्यांनी माहिती दिली. ते म्हणाले, "एअरटेल कंपनी अत्याधुनिक आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाचा उपयोग करुन ग्राहकांना स्पॅम कॉल आणि मेसेजबाबत कल्पना यावी याकरिता त्वरित अलर्ट देते. ग्राहकांनी चुकून एखादी लिंक क्लिक केली असेल तर ती लिंक ब्लॉक करण्याचीही सोय उपलब्ध करण्यात आली आहे. परंतु, आजच्या डिजिटल युगात आपले प्राथमिक बँक खाते किंवा इतर पेमेंट एप्लिकेशनशी जोडल्यास आपल्या बचतीला धोका निर्माण हो शकतो.", अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. हा धोका टाळण्यासाठी तसेच ग्राहकांचे पैसे सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांनी सेफ सेकंड अकाऊंट हा सुरक्षित आणि सोप्पा उपाय आता उपलब्ध करुन दिल्याचे ते म्हणाले.

ग्राहकांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात गोपाळ विठ्ठल यांनी सेफ सेकंड अकाउंटबद्दल तपशीलवार माहिती दिली. "सेफ सेकंड अकाउंट हे मुख्यतः दैनंदिन डिजीटल पेमेंटसाठी तयार करण्यात आले आहे. या खात्यात कमी रक्कम ठेवण्याचीही मुभा आहे. या शिल्लक रकमेवर व्याजही दिले जाते. एअरटेल पेमेंटस बँकेतून कर्ज किंवा क्रेडिट सुविधा देत नसल्याने या खात्यात मोठी रक्कम ठेवण्याची गरज नसते. हे खाते एअरटेल थँक्स एप्लिकेशनच्या मदतीने सुरु करता येते. याकरिता एप्लिकेशनमधील पेमेंट बँक या ऑप्शनवर क्लिक करा, आधार आणि पॅन आधारित केव्हायसी पूर्ण करा. एमपीन सेट करा, खात्यात थोडी रक्कम जमा करा. या प्रक्रियेनंतर तुम्ही व्यवहार सुरक्षितपणे सुरु करु शकता."

ग्राहकांना आपल्या मुख्य बँकेतील खात्यातून पैसे हस्तांतरित करुन किंवा एअरटेल पेमेंट्स बँकेच्या कोणत्याही अधिकृत रिटेल पोइंटवर रोख रक्कम जमा करुन सेफ सेकंड अकाउंटमध्ये सहजपणे पैसे अदा करता येतात. या सुविधेमुळे ग्राहकांना कोणत्याही अडथळ्याविना त्यांचे आर्थिक व्यवहार अनधिकृत पेमेंट्स तसेच फसवणूकीपासून सुरक्षित ठेवतात.

## हंगामा ओटीटीने २०२५मध्ये विविध शैलीतील ऑरिजिनल्ससह आपली कंटेंट स्लेट अधिक मजबूत केली




**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
भारतातील आघाडीच्या डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटीने 2025 मध्ये सर्वात वेगाने वाढणाऱ्या हिंदी भाषिक ओटीटी प्लॅटफॉर्म म्हणून आपली ओळख अधिक मजबूत केली. या वर्षी प्लॅटफॉर्मने थ्रिलर, क्राईम ड्रामा, सायकोलॉजिकल कथानक आणि बोल्ड नॅरेटिव्हजचा दमदार संच सादर केला. छोट्या गावातील रहस्यांपासून ते उच्चभ्रू समाजातील मनाचे खेळ, विविध कथा सांगण्याची हंगामा ओटीटीची ओळख यावर्षी आणखी बळकट झाली. नवीन चेहरे, प्रभावी अभिनय आणि यूनिकली इंडियन कथा यामुळे प्लॅटफॉर्मने प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

खाली 2025 मध्ये हंगामा ओटीटीवर आलेल्या प्रमुख ऑरिजिनल्सची माहिती दिली आहे:

मुंबईच्या एलिट जिम कल्चरमध्ये घडणारी ही कथा टीना दत्ता यांच्या नेतृत्वातील एक डार्क आणि रोमांचक थ्रिलर आहे. मालिकेत नेहा ही विवाहित स्त्री आहे, जी आपल्या ट्रेनरसोबतच्या नात्यात गुंतत जाते आणि त्याच्या रहस्यमय मृत्यूनंतर फसवणूक, इच्छा आणि धोक्यांच्या जाळ्यात अडकते. गुलशन नैन आणि साहिब टागरा यांनी या वेगवान थ्रिलरमध्ये दमदार अभिनय केला आहे.

एका लहान शहरातील सायकोलॉजिकल क्राईम ड्रामामध्ये युक्ती कपूर यांनी साकारलेली प्रतिभा आपल्या नवीन शेजारी सागरिका विषयी अनावर आकर्षण अनुभवते. तिच्या आयुष्यातील जुन्या गुपितांमुळे एक धोकादायक खेळ सुरू होतो. मोहित जोशी आणि चारू मेहरा यांच्या प्रभावी अभिनयासह ही मालिका ऑब्सेशन ,डिसेप्शन आणि मानवी गुंतागुंत यांचा वेध घेते. बेरहमीने झालेल्या काही हत्यांची मालिका सीबीआय च्या मोठ्या तपासाला सुरुवात करून देते. संशय एका प्रभावशाली उद्योजक विक्रम वर्मावर जात असताना नवनवीन खुलास्यांमुळे सत्य अधिक गुंतागुंतीचे बनते. धन्या बालकृष्णन, आशु रेड्डी आणि कौशल मंदा यांच्या ताकदीच्या अभिनयामुळे ही मालिका डिसेप्शन,ब्लॅकमेल आणि अनपेक्षित ट्विस्टसाठी ओळखली जाते.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०२५














## नवभारत हायस्कूल, शिवणे येथे अनुलोम संस्थेचा संविधान कार्यक्रम

**शिवणे (दै. आरंभ पर्व)**

अनुलोम संस्थेद्वारे नवभारत हायस्कूल येथे संविधान दिनानिमित्त एक विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला. अनुलोम भागजनसेवीका नयनताई चव्हाण यांच्या पुढाकारातून हा शैक्षणिक व जनजागृतीपर कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांकरिता संविधानाविषयी प्रश्नपत्रिका घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत संविधानातील विविध मूलभूत तत्त्वे, अधिकार आणि जबाबदाऱ्या याबद्दलची समज वाढवली.

या कार्यक्रमासाठी वपुणे भाजप शहर सचिव रोहिणीताई रहाणे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व, त्यातील मूल्ये आणि नागरिकांनी पाळावयाच्या कर्तव्यांविषयी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी संवादातून विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल आणखी जागरूकता निर्माण झाली.

तसेच, भाजप नेत्या रोहिणी रहाणे यांनी विविध ठिकाणी संविधान जनजागृतीचे अनेक कार्यक्रम आयोजित करून समाजात संविधान मूल्यांचा प्रसार करण्याचे सतत कार्य केले असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाला ॲड. नरसिंग लगड, यांच्यासह शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि अनुलोम संस्थेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

**प्रभाग क्रमांक ३५ साठी**

# प्रसन्नदादा जगताप प्रबळ दावेदार

## प्रभाग ३५ च्या सर्वांगीण विकासाची हमी : ॲड प्रसन्नदादा जगताप







**(दै. आरंभ पर्व)**

हिंगणे–सन सिटी परिसरातील "हक्काचा माणूस" म्हणून ओळख निर्माण केलेले माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप हे पुणे महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक 35 साठी सर्वाधिक चर्चेतले आणि प्रबळ दावेदार ठरत आहेत. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी दैनिक आरंभपर्व पुणे च्या मिशन महानगरपालिका सदरामध्ये नागरिकांशी संवाद साधताना आपल्या विकासाभिमुख दृष्टिकोनाची सविस्तर माहिती दिली. ॲड.जगताप यांनी गेल्या काही वर्षांत प्रभागातील अनेक महत्त्वाच्या कामांसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. हिंगणे, सिंहगड रोड–सन सिटी भागातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मेट्रोचा प्रस्ताव, उड्डाणपूलाची आवश्यकता, रस्ते सुधारणा, जलनिस्सारण, क्रीडांगणे आणि उद्यानांची उभारणी या सर्व कामांसाठी ते सक्रियपणे प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या पाठपुराव्यामुळे काही महत्त्वाच्या प्रकल्पांना गती देखील मिळाली आहे.प्रभागातील प्रत्येक नागरिक त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात सहज जाऊन आपली समस्या सांगू शकतो, यामुळे "हक्काचा माणूस" म्हणून जगताप यांची प्रतिमा अधिक दृढ झाली आहे. सर्वपक्षीय नेत्यांशी त्यांचे असलेले चांगले स्नेहसंबंध, वरिष्ठांशी सातत्यपूर्ण संवाद, आणि प्रभागाच्या प्रगतीसाठी असलेले त्यांचे वचनबद्ध योगदान यामुळे त्यांची ताकद अधिक वाढत आहे.

"प्रभाग 35 च्या सर्वांगीण विकासासाठी माझ्या प्रामाणिक प्रयत्नांना लोकांनी दिलेला प्रतिसाद हेच माझे खरे बळ आहे," असे जगताप सांगतात. नागरिकांच्या अपेक्षा, स्थानिक समस्या आणि विकासाच्या दिशेने असलेली त्यांची धडपड पाहता, पुणे महानगरपालिकेत "चौकार" ठोकण्यासाठी ते पूर्णपणे सज्ज असल्याचे स्पष्ट दिसते.

हिंगणे–सन सिटी प्रभागाला पुढच्या स्तरावर नेण्यासाठी काम करणारे आणि सर्वांना जोडून घेणारे नेतृत्व म्हणून ॲड. प्रसन्नदादा जगताप आज प्रभाग 35 च्या राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरले आहेत.

## पर्वती नागरिक कृती समितीचा 'गुणगौरव सोहळा

- **पर्वती पुण्यभूषण, पर्वती भूषण आणि पर्वती गौरव पुरस्कार जाहीर**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पर्वती नागरिक कृती समिती, सहकारनगर यांच्या वतीने आयोजित 'गुणगौरव सोहळा–2025' मध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. पुरस्कारांची घोषणा समितीच्यावतीने करण्यात आली असून मोठ्या उत्साहात कार्यक्रमाची तयारी सुरू आहे. यंदाचा पर्वती पुण्यभूषण पुरस्कार मा. पूजा धाटकर (छत्रपती पुरस्कार विजेती), अरुण रोडे, चंद्रकांत बेगमपुरे, विलास बाबर व मिलिंद क्षीरसागर यांना जाहीर झाला आहे. पर्वती भूषण पुरस्कार सुधीर मेटेकर, राजेंद्र देव, संजय कारंडे, अनघलक्ष्मी दुर्गा, मिनाक्षी आपटे, संजय जोग व सुरेश तोलगेकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. पर्वती गौरव पुरस्कार गिरीजा पुरंदरे, साक्षी काळे, आस्था मोरे, डॉ. यादव भोसले, डॉ. अर्चना जोशी, दीपक शिंदे, अश्विनी गडे, पल्लवी नगरकर, प्रा. बाजीराव गायकवाड व दिनेश ढोले यांना जाहीर झाले.

गणेशोत्सव पुरस्कार : प्रथम – मेहुणपुरा गणेशोत्सव मंडळ

अनुक्रमे – त्वष्टा कासार मंडळ, ऋतुराज मित्र मंडळ, मोहननगर मित्र मंडळ गौरी आरास स्पर्धा : आग्रे परिवार, तळेकर परिवार

घरगुती गणेशोत्सव : सुप्रिया तांबट दिवाळी अंक स्पर्धा : चपराक दिवाळी अंक याशिवाय 'लोकप्रतिनिधी पुणे' या कामगिरीबद्दल सुभाष दिगंबर जगताप यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक श्याम भुरके आणि श्रेया पाठक (अध्यक्ष, प.ना. कृषी समिती) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमोद शिंदे (मुख्याधिकारी, नेटसर्फ कंपनी) यांची प्रमुख उपस्थिती राहील.

आयोजन समितीत शारदा सरोदे (संयोजक), सुरज पोळ, प्रदीप जोगगाईकर, संजय काळोखे, पुरुषोत्तम थेटे, सुहास फडके, मिलिंद तांबोळी, संजय बिबवे, शैलेश जोशी, उन्मेष जाधव, आशिष जराड, चंद्रशेखर कोरडे, घनश्याम खलाटे, केतकी कुलकर्णी, पल्लवी सरोदे व तानाजी शिरोळे यांचा सहभाग आहे.

## मतदारांना आर्थिक प्रलोभन देत असल्याच्या संशयावरून मारहाण

- **नगराध्यक्षपदाच्या उमेदवारासह सात जणांवर गुन्हा दाखल**

**राजगुरूनगर-किरण खुडे दै. आरंभ पर्व)**

मतदारांना आर्थिक प्रलोभन देत असल्याच्या संशयावरून बेदम मारहाण केल्याचा आरोप व याप्रकरणी राजगुरूनगरचे माजी नगराध्यक्ष व नगराध्यक्षपदाचे उमेदवार शिवाजी मांदळे यांच्यासह सात जणांवर खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजगुरूनगर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही खळबळजनक घटना शुक्रवारी (दि.२८) रात्री साडेअकराच्या सुमारास घडली. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात या घटनेचे चित्रीकरण झाले आहे.



शहराचे माजी नगराध्यक्ष असलेले शिवाजी मांदळे हे भारतीय जनता पक्षाचे प्रभाग क्रमांक ६ मधून नगरसेवक पदासाठी आणि जनतेतून थेट नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आहेत. फिर्यादी साई विलास पिंगळे यांनी याप्रकरणी तक्रार दिली आहे. शिवाजी मांदळे यांच्यासह त्यांच्या साथीदारांनी दोन तरुणांना "मतदारांना पैशाची बॅग वाटताना पळून का गेला?" अशा संशयातून बेदम मारहाण केल्याचा आरोप झाला आहे.

दरम्यान, याविषयी बोलताना मांदळे म्हणाले, संबंधीत तरुण मतदारांना पैसे वाटप करताना आढळुन आले. कार्यकर्त्यांनी त्यांना पकडायचा प्रयत्न केला असता ते पळून चालले होते. कार्यकर्त्यांनी धक्काबुक्की केली, त्यांना रोखण्याचा मी प्रयत्न केला. तक्रारीत फिर्यादींनी जमीन पाहायला आल्याचे म्हटले आहे. पोलीस सखोल चौकशी करून न्याय देतील.




## थोडक्यात पण महत्वाचे



### बेबी कालव्यात जलपर्णी वाढल्याने साथीच्या आजाराचा धोका

**लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (आरंभ पर्व) : हवेली तालुक्यातील फुरसुंगी,लोणी काळभोर परीसरात गेल्या काही दिवसापासून बेबी कालव्याचे पाणी बंद असुन कालव्यात जलपर्णीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे कालव्यालगतच्या परीसरात मश्वरांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.त्यातून साथीचे आजार पसरण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त होत आहे.तसेच पाणी नसल्याने संडासच्या टाक्या साफ करणारे त्या उपसुन त्या राजरोसपणे कालव्यात बिनदिक्कतपणे गाड्या कालव्यात सोडत आहेत.स्थानिक कालव्यात कचरा तसेच मृत जनावरे,पोल्ट्रीच्या मेलेल्या कोंबड्या टाकत असल्याने दुर्गंधी पसरली आहे.पाणी सुरू असल्यास घाण साठत नाही.तरी पाटबंधारे खात्याने कालव्यातील जलपर्णी काढून साफसफाई करून पाणी सोडावे अशी मागणी या भागातील नागरीकांची आहे.**

### Ai+ ने "लॅपटॅब" केले सादर



**नवी दिल्ली (आरंभ पर्व) : भारतातील सर्वात वेगाने वाढणारा टेक ब्रँड असलेल्या Ai+ ने आज "Ai+ Laptab" ही एक नवीन स्मार्ट डिव्हाइस श्रेणी लाँच केली आहे जी लॅपटॉपची उत्पादकता आणि टॅब्लेटची पोर्टेबिलिटी एकत्र करते. भारतातील शिकणाऱ्या, निर्माते आणि व्यावसायिकांच्या संकरित पिढीसाठी डिझाइन केलेले, हे उपकरण तीन आकारांमध्ये उपलब्ध असेल: ११", १२" आणि १३" कीबोर्ड आणि स्टायलस सपोर्टसह. ते २०२६ च्या पहिल्या तिमाहीत फ्लिपकार्ट आणि Ai+ च्या रिटेल भागीदारांद्वारे देशभरात उपलब्ध असेल. हे लाँच Ai+ चा दुसरा मोठा हार्डवेअर उपक्रम आहे. यापूर्वी, Ai+ स्मार्टफोनने फक्त सहा महिन्यांत १० लाख वापरकर्त्यांचा आकडा ओलांडला होता, ज्यामुळे भारताच्या सार्वभौम तंत्रज्ञान क्षेत्रात Ai+ ची मजबूत उपस्थिती निर्माण झाली होती. Ai+ Laptab ची कल्पना सोपी आहे: एकच उपकरण जे सर्वकाही करू शकते. ऑनलाइन वर्गात उपस्थित राहण्यापासून ते प्रेझेंटेशन संपादित करण्यापर्यंत, शो पाहण्यापर्यंत आणि जाता जाता विचारमंथन करण्यापर्यंत, वापरकर्ते आता डिव्हाइस बदलल्याशिवाय किंवा प्रवाह खंडित न करता उत्पादकता आणि मनोरंजनामध्ये अखंडपणे स्विच करू शकतील.**


**सौ. सायली सागर कोल्हे : प्रभाग ३३ मधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रबळ ओबीसी उमेदवार म्हणून सायली कोल्हे यांची चर्चा!**

# पक्षासाठी योगदान दिले आता निश्चितपणे संधी मिळेल

**(दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सौ. सायली सागर कोल्हे यांचे नाव प्रबळ दावेदार म्हणून जलदगतीने। पुढे येत आहे. महिला सक्षमीकरण, शिक्षण, समाजकारण आणि सातत्याने लोकांमध्ये राहून केलेले काम या आधारे त्यांची प्रतिमा अधिक मजबूत होत आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून एकमेव OBC महिला दावेदार म्हणून समोर येत असून, प्रभागातील मोठ्या OBC मतदारसंघाला एकत्र आणण्याची क्षमता त्यांच्याकडे असल्याने पक्षालाही त्यांच्याकडून मोठी अपेक्षा आहे.

दैनिक आरंभपर्व पुणे च्या मिशन महानगरपालिका सदरामध्ये सौ. सायली सागर कोल्हे यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी सांगितले की, "आजपर्यंत आम्ही पक्षासाठी मनापासून आणि निष्ठेने काम केले आहे. लोकांमध्ये जोड निर्माण केली आहे. आता हीच वेळ आहे की पक्षाने आम्हाला संधी द्यावी. मिळालेली संधी आम्ही नक्कीच सोने करू आणि प्रभागाचा संपूर्ण विकास करून दाखवू." त्यांच्या या आत्मविश्वासामुळे नागरिकांमध्येही सकारात्मक भावना निर्माण झाली आहे.





सायलीताईंच्या सामाजिक कामाचा झपाटा मोठा आहे. क्रेझ इंग्लिश मिडियम स्कूल कोल्हेवाडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे, महिलांसाठी बचत गटांची स्थापना, मोरया एक्झिबिशन, नवरात्रातील विविध स्पर्धा, आठवडी बाजार, सामाजिक कार्यक्रम असे अनेक उपक्रम त्यांनी यशस्वीपणे राबवले आहेत. या माध्यमातून अनेक महिलांना आणि विद्यार्थ्यांना प्रगतीची संधी मिळाली. प्रभाग ३३ मधील महिलांमध्ये त्यांच्याबद्दल विश्वास आणि जवळीक लवकरच निर्माण झाली आहे.




त्यांची उमेदवारी अधिक मजबूत ठरते ती त्यांची राजकीय पार्श्वभूमी पाहता. त्यांचे पती सागर कोल्हे हे गेली १७ वर्षे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विश्वासू, निष्ठावंत आणि सक्रिय समर्थक आहेत. विद्यार्थी राष्ट्रवादी काँग्रेसपासून ते खडकवासला विधानसभा युवकाध्यक्ष अशी त्यांची प्रवासगाथा जिद्द आणि निष्ठा दर्शवणारी आहे. धायरी गावचे माजी उपसरपंच गणेशदादा बेनकर यांचा राजकीय वारसा त्यांच्या कुटुंबात असल्याने लोकांशी जोड आणि सामाजिक नातेवाईकांचं जाळं खूप विस्तृत आहे. याच राजकीय आणि सामाजिक पाठींब्यामुळे सायली कोल्हे यांच्या उमेदवारीला अधिक बळ मिळत आहे.

सायलीताई यांनी स्पष्ट केले की, "समाविष्ट गावांमध्ये पायाभूत सुविधा अत्यंत गरजेच्या आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, बौद्धिक सुविधा, नागरिकांसाठी सुरक्षितता आणि महिलांसाठी रोजगाराच्या संधी — हे सर्व आमच्या प्राधान्यक्रमात असेल." प्रभागातील दीर्घकाळ प्रलंबित कामांना वेग देण्याचा त्यांनी निश्चय व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेसकडून एकमेव OBC महिला दावेदार असल्यामुळे त्यांच्या उमेदवारीला मिळणारा सामाजिक पाठींबाही मजबूत आहे. प्रभागातील मोठ्या OBC मतदारसंघामध्ये त्यांना चांगला प्रतिसाद मिळत असून महिलांमध्ये त्यांची लोकप्रियता वाढत आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात एकत्रित ताकद दाखवणाऱ्या सायली सागर कोल्हे या आगामी महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग ३३ साठी प्रभावी आणि सक्षम नेतृत्व म्हणून उदयास येत आहेत.

**त्यांच्या नेतृत्वामुळे प्रभाग ३३ ला नवी दिशा, वेगवान विकास आणि महिला सक्षमीकरणाची नवी ओळख मिळेल. महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर व अक्रूरशेठ कुदळे हे सायली कोल्हे यांना उमेदवारी देतील असा विश्वास समाजबांधव व नागरिकांना वाटत आहे.**

## थोडक्यात पण महत्वाचे



### महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त धायरी येथे विनम्र अभिवादन

धायरी (आरंभ पर्व) : भारतीय शिक्षण क्षेत्रात आणि समाजसुधारणेत महान योगदान देणारे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त धायरी येथे विनम्र अभिवादन करण्यात आले. समता, शिक्षण आणि सामाजिक न्याय या विचारांची आजही समाजाला दिशा देणारी कार्ये त्यांनी केली. त्यांची प्रेरणादायी आठवण या प्रसंगी ताजीतवानी करण्यात आली. प्रदेश भाजपा ओबीसी मोर्चा सचिव दत्ताभाऊ कोल्हे यांच्या जनसंपर्क कार्यालयात हा अभिवादन कार्यक्रम पार पडला. महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करताना उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या शिक्षणप्रेमी, समाजजागृती करणाऱ्या आणि सर्वसमावेशक विचारसरणीचा उल्लेख केला. या कार्यक्रमाला प्रदेश भाजपा ओबीसी मोर्चा सचिव दत्ताभाऊ कोल्हे, खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे, मनसे नेते शिवाजीराव मते, नऱ्हेचे माजी उपसरपंच सागर भूमकर , दिपक आबा रायकर व देविदास रायकर व संतोष प्रभाकर रायकर व महेंद्र दादा रायकर व व तुषारभाऊ पोकळे व बाळासाहेब मंडलिक ,सर्वेश सातव, राहुल कोल्हे, शिवाजी कोल्हे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. महात्मा फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचा संकल्प उपस्थित सर्वांनी या निमित्ताने व्यक्त केला.



### नवभारत विद्यालयात संविधान ७५ कार्यक्रम उत्साहात संपन्न

शिवणे, पुणे (आरंभ पर्व) : नवभारत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (पुणे जिल्हा शिक्षण मंडळ) येथे अनुगामी लोकराज्य महाभियान (अनुलोम) या संघटनेतर्फे २६ नोव्हेंबर २०२५ 'संविधान ७५' हा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा उपक्रम भाग जनसेविका सौ. नयन निलेश चव्हाण यांनी आयोजित केला होता. कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून ॲड. नरसिंग दादा लगड, रोहिणीताई राहणे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची महत्त्व, त्याची वैशिष्ट्ये आणि नागरिकांनी पाळावयाच्या कर्तव्यांविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता आणि राष्ट्रनिष्ठा दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. शाळा प्रशासन, शिक्षकवर्ग आणि अनुलोम संघटना यांच्या सहयोगामुळे संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.







# स्नेह मेळा आणि दीपांजली : नीलम गोऱ्हे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त यावर्षी एक खास पूर्वसंध्या दीपांजली व स्नेह मेळा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. भिडे वाडा समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे यांच्या आयोजनातून हा उपक्रम सलग पाचव्या वर्षी आयोजित करण्यात आला असल्याने कार्यक्रमाला अधिकच विशेष महत्त्व मिळाले. नागरिक, युवक आणि शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याच्या उपसभापती नीलम गोऱ्हे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी महात्मा फुले यांच्या कार्याची आठवण करून देत सांगितले की,

"महात्मा फुलेंचे कार्य आदर्शवादी प्रेरणा म्हणून कायमस्वरूपी स्मरणार्थ राहील. त्यांच्या विचारांमध्ये समाज बदलण्याची ताकद आहे." त्यांनी पुढे महिलांचे शिक्षण, समता आणि समाज uplift यासाठी फुले दांपत्यांच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला शिवसेनेचे व युवासेनेचे अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये माजी आमदार रवींद्र धंगेकर, शिवसेना-युवासेना राज्य सचिव किरण साळी,युवासेना जिल्हाप्रमुख निलेश घारे, युवासेना जिल्हाप्रमुख सोमनाथ कुटे, कसबा मतदारसंघाचे क्षेत्रप्रमुख निलेश जगताप, अभिजीत पवार यांचा समावेश होता. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी युवकांनी जोडून काम केले. राम तोडकरी, लोकेश राठोड, ऋतिक गलांडे, विनोद राठोड, गणेश राठोड, अनिकेत रावळेकर, प्रशांत जाधव, सतीश ढेरे, बबलू सुर्यवसे, सचिन कांबळे, आकाश चव्हाण, ओम चव्हाण, अनिकेत गायकवाड, प्रतीक देडगे आणि खंडू बेनकर

या सर्वांनी आयोजनाची पूर्ण जबाबदारी उचलून कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. दीपांजली दरम्यान महात्मा फुलेंच्या स्मृतीला अभिवादन करत उपस्थितांनी दिवे प्रज्वलित केले. त्यानंतर झालेल्या स्नेह मेळ्यात सर्वांनी मैत्री, एकोपा आणि समाजासाठी एकत्र काम करण्याचा संदेश दिला. पाच वर्षांपासून सुरू असलेला हा उपक्रम आता स्थानिकांसाठी प्रेरणादायी परंपरा बनला आहे. महात्मा फुले यांच्या विचारांना पुढे नेण्याचा संकल्प आयोजक निलेश गिरमे यांनी व्यक्त केला. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

### शालेय साहित्याचे वाटप

**महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून संकल्प फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष निलेश गिरमे यांच्या संयोजनातून शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. मा. फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित केलेला हा उपक्रम सामाजिक जाणीव असलेला आदर्श उपक्रम ठरला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.**

## कुडजे येथे एकल सक्षमीकरण शिबीर; नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**सिंहगड-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**



कुडजे येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानांतर्गत आयोजित एकल सक्षमीकरण शिबिरास नागरिकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. ग्रामविकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक प्रबोधन यांचा समन्वय साधणाऱ्या या शिबिरात विशेषत: महिला, युवती आणि ज्येष्ठ नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, कौशल्यविकास, स्वयंरोजगार, आरोग्य तपासणी आणि कायदेशीर सहाय्य आदी विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. विभागनिहाय उभारण्यात आलेल्या स्टॉलमुळे नागरिकांना तात्काळ माहिती, नोंदणी आणि लाभांविषयी स्पष्ट मार्गदर्शन मिळाले. ग्रामपंचायत, स्थानिक प्रशासन आणि स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने आयोजित हे शिबिर प्रत्येक कुटुंबापर्यंत योजनांचा लाभ पोहोचवण्याच्या समृद्ध पंचायत अभियानाच्या उद्दिष्टाला बळकटी देणारे ठरले. शिबिराला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने व्हावे, अशी मागणीही ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## प्रभाग ३३ आणि ३४ मध्ये राजकीय हालचाली वेगात

### राष्ट्रवादी काँग्रेस व महाविकास आघाडीची "अंडरग्राउंड प्लॅनिंग" सुरू असल्याची कुजबुज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक 33 आणि 34 मध्ये आगामी निवडणुकांचा ताप वाढत चालला आहे. विविध पक्षातील इच्छुकांनी तयारीला सुरुवात केली असली, तरी ही निवडणूक लढवायची म्हणत मैदानात उतरणाऱ्या प्रत्येकालाच तिकीट मिळेल अशी खात्री नाही, अशी चर्चा राजकीय गल्लीबोळात जोर धरू लागली आहे.

यामुळे अनेक इच्छुकांनी अप्रत्यक्षपणे 'प्लॅन बी' तयार करून ठेवला असल्याची कुजबुज सुरू आहे. पक्षाकडून तिकीट मिळाले नाही तर कोणत्या पक्षाशी नैसर्गिकरीत्या जवळीक वाढवायची, कुठे पुढील राजकीय पायाभरणी करायची, याचा विचार काही इच्छुकांनी शांतपणे सुरू केला असल्याची अफवा पसरली आहे.

दरम्यान, या परिस्थितीचा फायदा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि महाविकास आघाडी या दोन्ही पटलांवर दिसतो आहे. कारण भाजप तसेच इतर पक्षांत तिकिटाच्या अनिश्चिततेमुळे निर्माण झालेल्या असंतोषाचा परिणाम म्हणून तगडे, जनाधार असलेले आणि कार्यकर्त्यांचा मोठा सपोर्ट असलेले काही चेहरे शिवसेना , राष्ट्रवादी काँग्रेस व महाविकास आघाडीच्या दिशेने वळण्याची शक्यता राजकीय चर्चेत पुढे येत आहे.

राजकीय पातळीवर हे दोन्ही प्रभाग अत्यंत महत्त्वाचे समजले जातात. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाविकास आघाडी यांनी आतूनच अंडरग्राउंड प्लॅनिंग सुरू केली असल्याचे समजते. स्थानिक पातळीवर ताकदवान उमेदवार ओळखणे, समाजघटकांशी संपर्क वाढवणे, तसेच विविध कार्यकर्त्यांना आपल्या बाजूस खेचण्याची मोहीम शांतपणे सुरू आहे.

याचदरम्यान, भाजपमध्येही इच्छुकांची संख्या मोठी असून, तिकीट मिळाले तरच पुढे राहायचे, अन्यथा नवे राजकीय समीकरण तयार करायचे, अशी मनःस्थिती काही जणांमध्ये असल्याची चर्चा आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत दोन्ही प्रभागांत नवीन राजकीय उलथापालथ शक्य असल्याचे जाणकारांचे मत आहे.

**प्रभाग 33 आणि 34 या दोन्ही ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांची लक्षं आता केवळ निवडणुकीवर नाही, तर कोण कोण कुठे जाणार? कोणाचा प्लॅन बी काय आहे? आणि खऱ्या अर्थाने तगडे उमेदवार कोण समोर येणार? याकडे लागली आहेत. एकूणच, आगामी निवडणूक जवळ येत असताना राजकीय तापमान दिवसेंदिवस चढत असून, आघाडी आणि राष्ट्रवादी पक्षांसाठी ही परिस्थिती अनुकूल ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

## खानापूर–खेडशिवापूर गटात राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्क्या दावेदार : पुजाताई नवनाथ पारगे

**विशाल भालेराव(दै. आरंभ पर्व)**




खेडशिवापूर - खानापूर–खेडशिवापूर गटात आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून माजी सभापती पुजाताई नवनाथ पारगे या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्क्या दावेदार म्हणून पुढे आल्या आहेत. स्थानिक विकास, महिला नेतृत्व आणि समाजकारणातील सक्रीय भूमिकेमुळे त्या इच्छुक उमेदवार म्हणून पक्षातही त्यांचे नाव जोरदार चर्चेत आहे. पुजाताई पारगे यांना मजबूत राजकीय परंपरा लाभलेली असून त्यांचे पती हे माजी जिल्हा परिषद सदस्य होते. सामाजिक कार्य, जनसंपर्क आणि ग्रामविकासातील अनुभवामुळे त्यांचे नाव गटातील नागरिकांमध्ये विश्वासार्ह नेतृत्व म्हणून घेतले जाते. आपल्या कार्यकाळात त्यांनी रस्ते, पाणीपुरवठा, महिला सक्षमीकरण, शैक्षणिक सुविधा आणि आरोग्यविषयक प्रकल्पांवर विशेष भर दिला. गटातील सर्वच गावांमध्ये प्रत्यक्ष भेटी देत समस्या जाणून घेणे आणि तातडीने प्रशासनाकडे पाठपुरावा करणे ही त्यांची कार्यशैली विशेष उल्लेखनीय ठरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक पातळीवरील सूत्रांनीही पुजाताईंचे नाव गंभीरपणे विचारात घेतल्याची चर्चा असून, गटात मजबूत, स्वच्छ प्रतिमेच्या उमेदवाराची गरज पूर्ण करणारे नाव म्हणून त्या पुढे येत आहेत.

## कोंढावळे ग्रामपंचायतीला ISO 9001:2015 मानांकन

**कोंढावळे (दै. आरंभ पर्व)**

- **ग्रामविकासातील गुणवत्ता आणि पारदर्शकतेचा आदर्श**

ग्रामविकासातील गुणवत्ता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची पायवाट भक्कम करत ग्रामपंचायत कोंढावळे यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे ISO 9001:2015 – क्वालिटी मॅनेजमेंट सिस्टिम प्रमाणपत्र मिळाले आहे. ग्रामीण प्रशासनातील उत्कृष्ट कार्यप्रणालीचा हा मानाचा टप्पा ठरत असून, तालुक्यातील इतर ग्रामपंचायतींसाठीही हे प्रेरणादायी उदाहरण ठरणार आहे. या यशामागे विद्यमान लोकनियुक्त सरपंच सौ. पल्लवी अमित कंधारे यांचे दूरदर्शी, सक्षम आणि जनभावनांना समजून घेणारे नेतृत्व महत्त्वाचे ठरल्याची नोंद सर्वत्र घेतली जात आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायतीने शिस्तबद्ध कारभार, नागरिककेंद्रित सेवा आणि सुसंगत व्यवस्थापनावर भर दिला. ग्रामीण पायाभूत सुविधांच्या उभारणीत कोंढावळे गावाने गेल्या काही वर्षांत झपाट्याने प्रगती केली आहे. जलसंधारण, स्वच्छता मोहिमा, दर्जेदार रस्ते व नालेबांधणी, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील उपक्रम तसेच पर्यावरण संवर्धनासाठीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे गावाने एक वेगळा दर्जा निर्माण केला आहे.

## महात्मा फुले मंडईचे नाव मेट्रोला नकोसे?




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

- **नाव बदलासाठी माळी महासंघाचे बेमुदत उपोषण सुरू**

महात्मा फुले मंडई या ऐतिहासिक व ओळख असलेल्या परिसराला मेट्रो प्रशासनाकडून फक्त 'मंडई मेट्रो स्टेशन' असे नाव देण्यात आल्याच्या निषेधार्थ माळी महासंघ, पुणे शहर आक्रमक झाला आहे. स्टेशनला 'महात्मा फुले मंडई मेट्रो स्टेशन' हेच नाव द्यावे, या मागणीसाठी महासंघाने 28 नोव्हेंबरपासून बेमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे. महात्मा फुले यांचे कार्य, विचार आणि सामाजिक योगदान लक्षात घेता परिसराचे मूळ नाव अबाधित ठेवणे आवश्यक असल्याचे मत संघटनेने व्यक्त केले. "महात्मा फुले यांची परंपरा आणि पुण्याचा इतिहास जपण्यासाठी स्टेशनचे नावही तसेच असले पाहिजे. केवळ 'मंडई' असे नाव देणे ही इतिहासाला पुसण्याची प्रवृत्ती आहे," असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. उपोषण स्थळी मोठ्या प्रमाणात नागरिक, समाजबांधव व तरुण सहभागी होत असून, मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार महासंघाने दर्शविला आहे. यासंदर्भात सर्व समाजबांधवांना आवाहन करण्यात आले आहे की, "आपल्या योग्य मागणीसाठी मोठ्या संख्येने आंदोलनस्थळी सहभागी व्हावे."

## पंचवीस हजार कोटींच्या सिंहस्थ खर्चास भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या

# भरोशावर कसे काय सोडावे?

**पुणे-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**



नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला वेग आला आहे. सुमारे २५ हजार कोटींच्या प्रचंड बजेटचा विनियोग कसा आणि कोण करणार, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. कारण, मागील सिंहस्थमधील भ्रष्टाचार, फुगीर अंदाजपत्रके आणि तिपटीने वाढवलेल्या बिलांची नाशिककर आजही विस्मृती करू शकलेले नाहीत.

याच पार्श्वभूमीवर यंदाच्या सिंहस्थातही 'लॉटरी कुणाला?' हा प्रश्न सर्वत्र चर्चिला जात होता. नाशिकचे पालकमंत्री कोण असावेत यावरून वर्षभर चाललेली ओढाताण हेच दाखवत होती की एवढ्या मोठ्या निधीच्या 'तिजोरीच्या चाव्या' कोणाच्या हाती द्यायच्या यावरून राजकीय संघर्ष तीव्र होता.

शेवटी, एक नवा फंडा काढत सरकारने मागील कुंभमेळ्याचे प्रभारी असलेले ना. गिरिषभाऊ महाजन यांनाच 'कुंभमेळा मंत्री' म्हणून नेमले. म्हणजे आता या २५ हजार कोटींचा खर्च त्यांच्या अखत्यारीत. अपेक्षा अशी की ते काटेकोरपणे पैशांचा योग्य विनियोग करतील, भ्रष्टाचाराला थारा देणार नाहीत, फुगीर इस्टिमेट होऊ देणार नाहीत आणि ठराविक कंत्राटदारांचे वर्चस्व मोडतील.

मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनीही व्यासपीठावरून आश्वासन देत सांगितले होते की, "सिंहस्थातील सर्व कामे पारदर्शक व दर्जेदार होतील. ती अधिकाऱ्यांवर सोडा. नेते- पत्रकारांनी टेंडरमध्ये नाक खुपसू नये." परंतु, या विधानानेच प्रश्न अधिक गंभीर बनतो. नाशिकच्या पोलीस कमिशनरेटने गुन्हेगारीला आळा घालून स्वच्छ प्रतिमा निर्माण केली, हे खरे; पण मनपा व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 'महाभ्रष्ट' प्रतिमेत काय अचानक चमत्काराने सुधारणा झाली?

'चोर चोरीसे जाये, हेराफेरी से नही' — ही हिंदी म्हण आजही तितकीच खरी. देशभरात एसीबी आणि इडीच्या छाप्यातून नोटांचे ढीग, किलोने सोने, प्लॅटिनम, हिरे, बंगले, फार्महाऊसेस बाहेर येत असताना हेच अधिकारी कालपर्यंत 'प्रामाणिक' म्हणून गौरवले जात होते. मग अचानक हे इतके पारदर्शक कधी झाले?

मागील काही वर्षांत वसई-विरार, ठाणे, जालना आदी मनपांच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांनी राज्य हादरले आहे. अनेक मनपा आयुक्त कोट्यावधींच्या गैरव्यवहारात पकडले गेले. मग अशा परिस्थितीत २५ हजार कोटींच्या सिंहस्थ खर्चाबाबत "पत्रकार व नेत्यांनी टेंडरमध्ये लक्ष घालू नये" हा सल्ला कसा योग्य मानायचा?

इतका प्रचंड निधी पूर्णपणे अधिकाऱ्यांच्या भरोशावर सोडण्याइतकी यंत्रणा स्वच्छ, जबाबदार आणि निर्भेळ पारदर्शी कधी झाली? याचे उत्तर आधी मिळाले पाहिजे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे




## दीड वर्षाच्या नील भालेरावची 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंद

पुणे (आरंभ पर्व) : दीड वर्षाच्या चिमुकल्या नील निखिल भालेरावने अवघ्या 2 मिनिटे 53 सेकंदात जगातील तब्बल 45 कार ब्रँडची अचूक ओळख देत 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये स्थान मिळवले आहे. एवढ्या कमी वयात केलेला हा विक्रम उल्लेखनीय ठरत असून नीलच्या निरीक्षणशक्ती, स्मरणशक्ती आणि आत्मविश्वासाची झलक त्यातून दिसून येते. नीलच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. अनेकांना हे आश्चर्य वाटत आहे की एवढ्या लहान मुलाने इतकी ब्रँड नावे केवळ लक्षातच ठेवली नाहीत, तर ती स्पष्टपणे ओळखून दाखवली. त्यामुळे त्याचे कौशल्य भविष्यात आणखी कोणत्या पातळीवर झेपावेल याची उत्सुकता वाढली आहे. या यशामागे नीलची जिद्द, कुतूहल आणि सातत्याबरोबरच आई प्रेरणा भालेराव आणि वडील निखिल भालेराव यांचे मार्गदर्शन आणि सकारात्मक प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले आहे. मुलांमधील नैसर्गिक गुण ओळखून योग्य दिशेने प्रोत्साहन दिल्यास ते कोणत्या उंचीवर पोहोचू शकतात, याचे हे प्रेरणादायी उदाहरण असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले. नीलच्या या विक्रमामुळे पुणे, महाराष्ट्र आणि देशाचे नाव अभिमानाने उज्ज्वल झाले आहे.

## गुंड गजानन मारणेला जामीन



पुणे (आरंभ पर्व) : शहरात विविध गुन्ह्यांमध्ये सहभागी म्हणून पोलिसांच्या रडारवर असलेल्या गुंड गजानन मारणेला न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. त्याच्याविरुद्ध मारामारी, गैरकायदेशीर वसुली आणि धमकी देणे अशा गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांची नोंद असल्याने या निर्णयाकडे शहराचे लक्ष लागले होते. गजानन मारणे गेल्या काही दिवसांपासून पोलिस कोठडीत असून त्याची जामिनासाठीची सुनावणी आज पार पडली. दोन्ही बाजूंच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने काही अटींसह त्याला जामीन दिल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. दरम्यान, या निर्णयानंतर संबंधित परिसरात काही प्रमाणात चर्चा रंगली असून पोलिसांनी कडक नजर ठेवण्याचे तसेच कोणत्याही कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावर तात्काळ कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. गुन्ह्यांच्या वाढत्या पार्श्वभूमीवर, अशा प्रकारच्या आरोपींना जामीन मिळाल्यानंतर पोलिस यंत्रणेपुढे आव्हान अधिक वाढत असल्याचेही मत व्यक्त केले जात आहे.

## अवैध वाळू वाहतुकीवर प्रशासनाचा धरक अस्मानी बडगा



सिंहगड (आरंभ पर्व) : जिल्ह्यात वाढत्या अवैध वाळू वाहतुकीवर आता प्रशासनाने सक्त नजर ठेवत कठोर कारवाई सुरू केली आहे. नियमबाह्य वाहतूक करणाऱ्या वाहनांचा परवाना सरळ रद्द करण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला असून, संबंधितांवर फौजदारी गुन्हे नोंदवण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. संयुक्त महसूल, पोलिस व खनिज पथके नदीकाठच्या भागांत गस्त वाढवत आहेत. अवैध वाळूउचल, बनावट पास, ओव्हरलोड किंवा जीपीएसशिवाय वाहतूक आढळल्यास खालील कारवाई होणार आहे .

## सौ. रोहिणीताई रहाणे यांच्या पुढाकाराने सक्षमीकरणाचा उपक्रम

धायरी (आरंभ पर्व) : प्रभाग क्रमांक 33 च्या भाजपा इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांमध्ये ओळख निर्माण केलेल्या भाजप नेत्या सौ. रोहिणीताई रहाणे यांनी रायकर मळा परिसरात महिलांसाठी एक महत्त्वाचा सक्षमीकरण कार्यक्रम आयोजित केला. परिसरातील महिलांना स्वावलंबी होण्यासाठी आवश्यक माहिती, मार्गदर्शन आणि सरकारी योजनांचा प्रत्यक्ष उपयोग कसा करायचा याबाबत या कार्यक्रमात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. महिलांसाठी महाराष्ट्र शासन आणि पुणे महानगरपालिकेमार्फत अनेक योजना राबवल्या जातात. पण त्यांची माहिती अनेकांपर्यंत पोहोचत नाही. हे लक्षात घेऊन रोहिणीताई रहाणे यांनी स्वतः पुढाकार घेत महिलांना या सर्व योजनांची माहिती करून दिली. महिलांना त्यांच्या कुटुंबाचा आधार बनण्यासाठी शिक्षण, रोजगार, उद्योजकता आणि आर्थिक स्वावलंबन किती महत्त्वाचे आहे हे त्यांनी सोप्या भाषेत समजावून सांगितले. कार्यक्रमात उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महिला भगिनींना साडी भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यामुळे महिलांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्ट दिसत होता. महिलांनीही रोहिणीताईंना या उपक्रमाबद्दल मनापासून आभार मानले. या कार्यक्रमाला रायकर मळा आणि आसपासच्या परिसरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्वांनी एकच अपेक्षा व्यक्त केली – अशा उपक्रमांमुळे महिलांना उभारी मिळते आणि समाजात आत्मविश्वासाने पुढे जाण्याची ताकद प्राप्त होते. सौ. रोहिणीताई रहाणे यांनी सांगितले की, "महिलांची प्रगती म्हणजे घराची प्रगती. आणि समाजाची प्रगती. त्यामुळे महिलांसाठी अशा उपक्रमांचे आयोजन भविष्यातही सुरू राहील." धायरी परिसरात महिलांसाठी सक्षमीकरणाचा हा उपक्रम खरोखरच सकारात्मक ठरला आहे.



# ३००० महिला भगिनींचा महाकाल यात्रेसाठी भव्य प्रस्थान

### शिवसेना नेते संदीप मते यांच्या उपक्रमाला जबरदस्त प्रतिसाद

**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**



खडकवासला–शिवणे–धायरी प्रभागातील महिला भगिनींसाठी शिवसेना नेते संदीप मते यांनी आयोजित केलेल्या उज्जैन महाकाल यात्रेच्या पहिल्या टप्प्यात तब्बल ३००० महिला भगिनी आज खडकी रेल्वे स्टेशनवरून विशेष रेल्वेद्वारे भक्तिभावाने रवाना झाल्या.

स्टेशन परिसरात भक्तीगीतांचा आवाज, शंखनाद आणि महिलांचा उत्साहामुळे अत्यंत भावूक आणि आनंदी वातावरण निर्माण झाले होते.

यात्रेला शुभेच्छा देण्यासाठी शिवसेना उपनेत्या प्रा.सुषमाताई अंधारे या विशेष उपस्थित होत्या. त्यांच्यासोबत शिवसेना ठाकरे गटाचे शहराध्यक्ष गजानन थरकुडे, संजय मोरे, खडकवासला विधानसभा अध्यक्ष नितीनदादा वाघ, नरेंद्र हगवणे, पै. राहुल मते प्रभाग क्रमांक 33 मधील विविध मान्यवर विविध नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुषमाताईंनी संदीप मते यांच्या कामाचे कौतुक करत सांगितले, "या भागातील बहिणींनी भविष्यातील नेता निवडला आहे. संदीप मते हे सर्वांचे लाडके श्रावण बाळ आहेत. ते मनापासून समाजासाठी काम करत आहेत."

महिलांसाठी रेल्वेमध्ये प्रशस्त जागा, पिण्याचे पाणी, स्वच्छता, सुरक्षा आणि आरामदायी व्यवस्था करण्यात आली होती.

यात्रेत कोणत्याही भगिनीला त्रास होऊ नये म्हणून पूर्ण प्रवासभर सुमारे ५०० स्वयंसेवक महिला भगिनींच्या सेवेकरिता तैनात आहेत. हे सर्व स्वयंसेवक संदीपभाऊ मते मित्र परिवार आणि रोहित लायगुडे व त्यांच्या टीम यांच्या सहभागातून यात्रेची उत्तम जबाबदारी सांभाळत आहेत.

या उपक्रमाबद्दल बोलताना संदीपभाऊ मते म्हणाले, "महाकालाचे दर्शन घडवणे हे आमच्यासाठी समाधान आणि पुण्याचे काम आहे. हा पहिला टप्पा असून पुढील तीन टप्प्यांमध्ये अजून ७००० महिला भगिनींना महाकाल यात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे."

यात्रेला आलेल्या अनेक महिलांनी भावना व्यक्त करत सांगितले, "संदीप मते आमच्यासाठी खऱ्या अर्थाने श्रावण बाळ आहेत. त्यांनी आम्हाला दिलेला सन्मान आणि सेवा आम्ही कधीही विसरणार नाही. आम्ही भविष्यातही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू."

खडकवासला मतदारसंघात आमदार रमेश वांजळे यांच्या नंतर एवढ्या मोठ्या प्रमाणात आयोजित झालेली ही सर्वात मोठी यात्रा असल्याने प्रभागात या उपक्रमाची मोठी चर्चा असून महिला भगिनींमध्ये प्रचंड उत्साह आणि समाधानाचे वातावरण आहे.

## वॉटरपार्कमध्ये निष्काळजीपणा; घसरून मुलगा जखमी

**सिंहगड (दै. आरंभ पर्व)**



मौजे डोणजे (ता. हवेली) येथील कृष्णाई वॉटरपार्कमध्ये झालेल्या निष्काळजीपणामुळे निवृत्त डी.वाय.एस.पी. यांच्या मुलाला गंभीर दुखापत झाल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी वॉटरपार्कच्या प्रशासकाविरुद्ध बी.एन.एस. 2023 कलम 125 अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. फिर्यादी महेश शिवचरन देविकर (वय ५९, रा. वडगाव खुर्द, पुणे) हे कुटुंबासह दिनांक 23 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी साडेएकच्या सुमारास कृष्णाई वॉटरपार्कमध्ये गेले होते. त्या वेळी त्यांचा मुलगा आदित्य देविकर मोठ्या स्लाईडवरून खाली येत असताना स्लाईडमध्ये पाणी नसल्यामुळे तो जोरात घसरत बाहेर फेकला गेला. या अपघातात आदित्यच्या चेहऱ्याला, डोक्याला आणि ओठाला गंभीर मार लागला असून ओठाला दोन टाके घेणे आवश्यक ठरले. फिर्यादींच्या म्हणण्यानुसार, वॉटरपार्क प्रशासनाच्या दुर्लक्ष व देखरेखीअभावी ही घटना घडली. याप्रकरणी हवेली पोलीस ठाण्यात नोंद क्रमांक 09/2025 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासाची जबाबदारी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संतोष तोडकर यांच्याकडे देण्यात आली असून पोलीस निरीक्षक वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## डॉ. ए. व्ही. भोरे सर यांचा दुहेरी सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




श्रीमती काशीबाई नवले मेडिकल कॉलेज व जनरल हॉस्पिटल, पुणे यांचे संचालक डॉ. अरविंद वामनराव भोरे यांना वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्यसेवेत केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल दोन प्रतिष्ठित मंचांकडून गौरविण्यात आले.

वैद्यकीय व्यवस्थापन, आधुनिक आरोग्य सुविधा, विद्यार्थ्यांना दिले जाणारे दर्जेदार प्रशिक्षण आणि संस्थेमध्ये राबवलेल्या अभिनव उपक्रमांची दखल घेत त्यांना हा दुहेरी सन्मान मिळाला आहे.

मुंबई येथे आयोजित भारत 24 'लीडरशिप समिट 2025' मध्ये डॉ. भोरे यांना "Excellence in Medical Education" हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. देशभरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात वैद्यकीय क्षेत्रातील त्यांच्या नेतृत्वगुणांचे विशेष कौतुक करण्यात आले. वैद्यकीय शिक्षणात नवीन तंत्रज्ञान, संशोधन आणि विद्यार्थीकेंद्रित पद्धती रुजविण्यात त्यांनी बजावलेल्या भूमिकेची नोंद या सन्मानाद्वारे झाली.

त्यानंतर झी 24 तास आरोग्य परिषद 2025 मध्येही डॉ. भोरे यांना भव्य पुरस्काराने गौरविण्यात आले. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर ,तसेच झी 24 तासचे संपादक कमलेश सुतार यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला. आरोग्यसेवेतील सुधारणा, रुग्णकल्याणाचा दृष्टिकोन आणि मेडिकल कॉलेजमध्ये निर्माण केलेल्या शैक्षणिक संस्कृतीबद्दल त्यांना हा सन्मान बहाल करण्यात आला.

या दोन महत्त्वाच्या राष्ट्रीय मंचांकडून मिळालेला गौरव म्हणजे डॉ. ए. व्ही. भोरे यांचे वैद्यकीय शिक्षणातील नेतृत्व, दूरदृष्टी आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांची पावती असल्याची प्रतिक्रिया वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून व्यक्त होत आहे. त्यांच्यावर सर्व स्तराकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे. या दोन्ही सन्मानांबद्दल डॉ. भोरे यांनी वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या कामाची दखल घेतल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले व भविष्यातही वैद्यकीय क्षेत्रात संबंधित योगदान देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## राष्ट्रीय महामार्ग ते मानाजी नगर हा रस्ता कायमस्वरूपी बंद

### तातडीची कारवाई

- **नागरिकांना स्वामीनारायण मंदिर येथून येणाऱ्या सर्विस रस्त्याचा वापर करण्याचे आवाहन**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



नवले पूल परिसरातील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे राष्ट्रीय महामार्गावरून सेल्फी पॉइंट नऱ्हे येथील मानाजी नगर मार्गे जाण्याचा रस्ता आजपासून अधिकृतपणे बंद करण्यात आला आहे या बदलामुळे नागरिकांना साताऱ्याकडून पुण्याच्या दिशेने येताना स्वामीनारायण मंदिराशेजारील सर्विस रस्त्याचा वापर करणे आता बंधनकारक ठरले आहे

गेले काही महिन्यांपासून नवले पुलावर घडलेल्या अपघातांच्या मालिकेमुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी व चीड निर्माण झाली होती हा प्रश्न वारंवार उपस्थित करून सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी प्रशासनावरती दबाव आणण्यासाठी तिरडी आंदोलन व दशक्रिया आंदोलन असा थेट राष्ट्रीय महामार्गावर उतरून केलेल्या आंदोलनाच्या माध्यमातून परिस्थितीची गांभीर्यता अधोरेखित केली होती. या सलग आंदोलनाची दखल घेत अखेर राष्ट्रीय महामार्गाने तातडीची कारवाई करत अपघात प्रमाण क्षेत्रावर काही बदल करण्यासाठी म्हणून राष्ट्रीय महामार्गाकडून मानाजी नगर नऱ्हे या दिशेने जाणारा मार्ग हा सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या पाठपुराव्यामुळे अखेर बंद केला .

या बदलामुळे पुढील काही दिवस सर्विस रस्त्यावर वाहतुकीचा ताण वाढण्याची शक्यता आहे त्यामुळे नागरिकांनी संयम ठेवून प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन श्री भूपेंद्र मोरे यांनी केले.

याच बरोबरीने स्वामीनारायण मंदिर ते वारजे पूल या संपूर्ण रस्त्याचे नवीन रेखांकन करून एलिवेटेड पूल दर्जेदार व सुरक्षित बांधणे गरजेचे आहे असे मत त्यांनी व्यक्त केले .

आतापर्यंत या रस्त्यावरून वळण घेत असताना अनेकदा गंभीर अपघाताची शक्यता निर्माण होत होती अनेक वाहन चालकांनी जोखीम घेऊन वाहन वळवण्याचा प्रकार येथे सर्रास सुरू होता.

किमान आता तरी अपघाताची भीती कमी होईल व सर्विस रस्ता मोकळा राहील अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली

भविष्यात रस्त्याची नव्या पद्धतीने उभारणी मजबुतीकरण आणि योग्य नियोजन होईल अशी अपेक्षा व्यक्त करून नवले पूल परिसरातील सुरक्षितता वाढवण्यासाठी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष सौ.रूपालीताई चाकणकर तसेच प्रदेशाध्यक्ष श्री सुनीलजी तटकरे यांच्या माध्यमातून केंद्रीय वाहतूक मंत्री श्री नितीनजी गडकरी साहेब यांच्याशी बैठक करणे कामी दिल्लीला वेळ घेतलेली असून याबाबत नक्कीच लवकर पर्याय निघून या रस्त्याचे काम त्वरण सुरू होईल असे अशा श्री भूपेंद्र मोरे यांनी यावेळी व्यक्त केली.

## सर्वसामान्यांची सेवा करण्यासाठी उमेश खताळ प्रयत्नशील

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



प्रभाग क्रमांक 34 धायरी वडगाव नऱ्हे प्रभागातील सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी, गरजा आणि विकासकामांना प्राधान्य देणारे भारतीय जनता पार्टीचे तळागाळातील कार्यकर्ते , पदाधिकारी उमेश खताळ हे सातत्याने लोकांसाठी काम करत असल्याने त्यांच्याबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या तेरा वर्षांपासून भाजपमध्ये सक्रिय कार्यरत असलेल्या खताळ यांनी शांत स्वभाव, ठाम भूमिका आणि लोकांशी असलेले नाते यामुळे स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. रुग्णालयामध्ये अनेक गरजू रुग्णांना अत्यंत माफक दरात औषधांची मदत करून त्यांनी केलेली सामाजिक सेवा विशेष दखल घेण्यासारखी आहे.




दैनिक आरंभपर्व पुणेशी बोलताना त्यांनी सांगितले— "प्रभागातील सर्वसामान्य जनतेची सेवा हीच माझी खरी ताकद आहे. सामान्य माणूसच सामान्यांच्या समस्या समजू शकतो. त्यामुळे त्यांच्या विकासासाठी आणि रोजच्या अडचणी सोडवण्यासाठी मनापासून प्रयत्न करत आहे. प्रभाग 34 मधून मी भारतीय जनता पार्टीचा प्रबळ दावेदार आहे. पक्षाने मला संधी दिल्यास सर्वसामान्यांसाठी आणखी मोठ्या प्रमाणात काम करता येईल," असे खताळ यांनी स्पष्ट केले. उमेश खताळ यांच्या सातत्यपूर्ण कामामुळे आणि जनसंपर्कामुळे प्रभाग 34 मधील रहिवाशांच्या अपेक्षा त्यांच्या दिशेने वाढताना दिसत आहेत. आता पक्ष त्यांच्या नावाचा विचार करतो का, आणि सर्वसामान्यांचा हा कार्यकर्ता नगरसेवकपदी विराजमान होतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## हवेली पोलिसांनी पाठवला प्रतिबंधक कारवाईचा प्रस्ताव

**सिंहगड (दै. आरंभ पर्व)**

हवेली पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर संबंधित व्यक्तीविरुद्ध आधीपासूनच तीन गंभीर, दखलपात्र गुन्हे नोंद असल्याने भविष्यात सार्वजनिक शांतता भंग होण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी निदर्शनास आणले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांचा काळ सुरू असल्याने परिस्थिती अधिक संवेदनशील बनली असून, या पार्श्वभूमीवर हवेली पोलिसांनी प्रतिबंधक कारवाईसाठीचा प्रस्ताव न्यायालयात सादर केला आहे. प्राप्त प्रस्तावातील पुरावे तपासून पाहता, आरोपीची हालचाल व पाश्र्वभूमी पाहता "सदर व्यक्तीकडून कोणत्याही वेळी गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडू शकतो" अशी नोंद प्रस्तावात करण्यात आली आहे. या अनुषंगाने विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर तहसीलदार यांनी ना.ना.सं.क. कलम 129 अन्वये कार्यवाही करण्याबाबत प्राथमिक समाधान नोंदवले आहे.

न्यायालयाने नोटीसमध्ये नमूद केले आहे की - भाविष्यात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी संबंधित व्यक्तीकडून 'चांगल्या वर्तनाचा जामीन' (बॉण्ड) घेणे आवश्यक असून तत्पूर्वी त्यांची बाजू ऐकणे गरजेचे आहे. त्यासाठी संबंधित व्यक्तीस 26 डिसेंबर 2025 रोजी ठराविक वेळेत समक्ष उपस्थित राहून लेखी अथवा तोंडी कारणे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# उमेदवारीत पैशाचा प्रभाव वाढतोय

### नरेंद्र पारखे यांचे मत

- **प्रत्यक्ष समाजसेवकांना संधी कुठे?**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ३८ मध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. स्थानिक पातळीवर रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात सातत्याने काम करणारे कार्यकर्ते वर्षानुवर्षे सक्रिय असतानाही, उमेदवारीच्या वेळी पैसा आणि दबदबा असलेल्या व्यक्तींना प्राधान्य दिले जात असल्याची नाराजी नागरिकांतून व्यक्त होत आहे.

सामाजिक प्रश्नांवर सातत्याने काम करणारे नरेंद्र पारखे यांनी या पार्श्वभूमीवर आपलं सार्वजनिक मत नोंदवत सांगितलं की,

"उमेदवारी देताना कामगिरी, सातत्य आणि लोकांमध्ये असलेला विश्वास महत्त्वाचा असावा. पक्ष कोणताही असो, पण पैसा आणि बाह्यदबावामुळे समाजातील प्रत्यक्ष काम करणारे कार्यकर्ते मागे पडणं ही चिंतेची बाब आहे."

स्थानिक नागरिकांनीही अशाच भावना व्यक्त करत म्हटलं, "वर्षभर समाजात राहून, लोकांच्या समस्या सोडवणाऱ्या व्यक्तींना उमेदवारी मिळाली पाहिजे. निवडणुकीच्या काळात अचानक दिसणाऱ्या चेहऱ्यांवर विश्वास ठेवणं कठीण आहे."



महिलांनी आणि युवकांनीही स्पष्ट मत व्यक्त करत सांगितले की,

"उमेदवारी हक्काची असावी — पैशाने विकत घेतलेली नव्हे." आपले विचार पुढे मांडताना पारखे म्हणाले,

"मी कोणत्याही पक्षाविरोधात बोलत नाही. पण समाजात काम करणाऱ्यांची किंमत कमी होऊ नये, हा मुद्दा मांडणं हेच नागरिक म्हणून आपलं कर्तव्य आहे. राजकारणात बदल हवा असेल, तर उमेदवारी देण्याचा निकषही बदलण्याची गरज आहे." प्रभाग ३८ मध्ये या मतामुळे चर्चा अधिक तापू लागली असून, काम करणारा उमेदवार की पैसे लावणारा उमेदवार — हा प्रश्न पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### खडकवासला धरणाखालील धोकादायक टाकी हटवा : पै. राहुल मते

खडकवासला (आरंभ पर्व) : खडकवासला धरणाखाली कॅनॉलच्या बाजूला, रयत शिक्षण संस्थेच्या गेटशेजारी इरिगेशन विभागाची एक लोखंडी टाकी आहे. ही टाकी सध्या खूप जर्जर अवस्थेत आहे. टाकीतून सतत पाणी गळत आहे आणि या टाकीचा कोणताही वापर होत नाही, असे शाळा व्यवस्थापनाने सांगितले आहे. यातील सर्वात मोठी समस्या म्हणजे - टाकीखालील बांधकामाला खोल तडे गेले आहेत. त्यामुळे ही टाकी कधीही कोसळू शकते आणि विद्यार्थ्यांना तसेच परिसरातील नागरिकांना मोठा धोका आहे. शाळा व्यवस्थापनाने ही टाकी हटवण्यासाठी इरिगेशन विभागाशी आधीच पत्रव्यवहारही केला आहे. या गंभीर परिस्थितीवर ह्या भागातील सामाजिक कार्यकर्ते पै. राहुल मुरलीधर मते यांनी आवाज उठवला आहे. त्यांनी प्रशासनाला थेट प्रश्न विचारला आहे "टाकी कोसळून अपघात व्हायची वाट पाहत आहे का?" पै. राहुल मते यांनी इरिगेशन व PWD विभागाने तातडीने पाहणी करून ही निरुपयोगी व धोकादायक टाकी हटवावी, परिसर सुरक्षित करावा आणि विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात जाऊ नये यासाठी तातडीची कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. स्थानिक नागरिकांनीही ही समस्या लवकर सोडवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.



### नांदेड सिटीमध्ये भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा

- बहुजन हिताय संघाच्या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

नांदेड सिटी, पुणे (आरंभ पर्व) : बहुजन हिताय संघ, नांदेड सिटी यांच्या वतीने भारतीय संविधान दिनाचा भव्य कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शनिवार, दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या या उपक्रमात नागरिक, विद्यार्थी, समाजप्रेमी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत संविधानाबद्दलचा आदर व्यक्त केला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी भारतीय संविधानाचे सामूहिक वाचन करून झाली. उपस्थितांनी संविधानातील हक्क, कर्तव्ये आणि समानतेवरील विचारांना मान देत एकजुटीचा संदेश दिला. यानंतर संविधान विषयक मार्गदर्शनपर व्याख्यान घेण्यात आले, ज्याला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कार्यक्रमाला मनसे नेते शिवाजीराव मते आणि बाळासाहेब मंडलिक , पोलीस पाटील विशाल भाऊ कदम,यांनी विशेष उपस्थिती लावली. त्यांनी संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्याय या तत्त्वांची जपणूक करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे सांगितले. सायंकाळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी न्यायमूर्ती मा. बी. जी. कोळसे पाटील यांनी उपस्थित राहून संविधानाचा इतिहास, उद्दिष्टे आणि सामाजिक समरसता यावर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमात विशेष ऊर्जा निर्माण झाली. या कार्यक्रमात डॉ .प्रफुल्ल बनसोड, सुनील डांडगे, संदीप केदारी, डॉ .जयकुमार भोंगले, डेव्हिड मेश्राम, स्मिता वहाने, संदीप शांबरकर, आशाताई नगरळे, रत्नपाल भोंगडे, मंगेश ढोले यांसह अनेक मान्यवरांनी सहभाग घेतला आणि कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोठे सहकार्य केले. यानंतर संघाने तयार केलेल्या विविधपदरी वेबसाईटचे उद्घाटन करण्यात आले. तसेच तरुणांनी संविधान जागृतीवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक प्रा. सुभाष खंडागळे आणि प्रा. जीवन बनसोड यांनी संपूर्ण उपक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रम सुरळीत पार पाडला. दिवसाअखेर स्नेहमेळाव्यात सर्वांनी एकत्र बसून संविधान दिन साजरा केला. बहुजन हिताय संघाने सहकार्य केलेल्या सर्वांचे मनापासून आभार मानले.

### आर्यन वाघमारे चमकला; ६९ व्या स्कूल गेम्समध्ये कांस्यपदक



इटानगर (अरुणाचल प्रदेश) (आरंभ पर्व) : व्हर्साटाइल इंग्लिश मीडियम स्कूल, वडगाव बुद्रुक, सिंहगड रोड, पुणे (41) येथील आर्यन रामचंद्र वाघमारे याने 69 वी स्कूल गेम्स नॅशनल तायक्वांदो स्पर्धा 2025 मध्ये उज्ज्वल कामगिरी करत कांस्यपदक पटकावले. 17 वर्षे वयोगटातील 78 किलो वरील वजन गटात आर्यनने दमदार खेळ सादर करून महाराष्ट्राचे आणि शाळेचे नाव राष्ट्रीय स्तरावर झळकावले. स्पर्धेदरम्यान आर्यनने पहिल्या सामन्यात हरियाणाच्या खेळाडूला 2–0 असे पराभूत केले. दुसऱ्या सामन्यात ओडिशाच्या साहू कुमारवर 2–0 अशी मात करत पुढे वाटचाल केली. क्वार्टर फायनलमध्ये उत्तराखंडच्या कुमार मयंकवर 2–0 अशी निर्विवाद मात करून आर्यनने सेमी फायनलपर्यंत मजल मारली आणि अखेर उत्कृष्ट प्रदर्शन कायम ठेवत कांस्यपदकाची कमाई केली. या उल्लेखनीय यशात प्रशिक्षक राहुल भवाळ यांच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा असून आर्यनने त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# पत्रकारिता की पक्षनिष्ठा?

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**



**(दै. आरंभ पर्व)**

भारतातील पत्रकारिता ही चौथी सत्ता मानली जाते. समाजातील अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार आणि सत्तेचे दडपशाहीपुढे ताठ उभी राहणारी पायाभूत व्यवस्था-असा या क्षेत्राचा मूलभूत स्वभाव. पण गेल्या काही वर्षांत माध्यम क्षेत्रात एक धोकादायक प्रवृत्ती वाढताना दिसते. अनेक प्रतिष्ठित वृत्तपत्रे, न्यूज चॅनेल आणि वेब पोर्टल्स ही विशिष्ट पक्षांशी, गटांशी वा नेत्यांशी बांधील राहिलेली दिसतात. पक्षांचे भूमिका, प्रचार, धोरणे ही त्यांच्या बातम्यांमधून आणि संपादकीयातून स्पष्ट दिसून येते.

**माध्यमांची दावण राजकारण्यांच्या हातात**

पूर्वी एखाद्या पक्षाचा किंवा गटाचा प्रचार करण्याची जबाबदारी 'प्रचारकां'ची होती. परंतु आज एक मोठा भाग माध्यमांचाच हा प्रचार करताना दिसतो.

काही वृत्तपत्रांचे पान उघडा- काही पक्षांचा गौरव, काहींची टीका, निवडक आवाज, निवडक तथ्ये... पत्रकारिता नाही, तर राजकीय भूमिका हेच तिथले केंद्रबिंदू.

**हे चित्र का बदलले?**

- माध्यमांच्या मालकीचा मोठा भाग उद्योगपती आणि राजकीय गटांकडे.
- जाहिरात महसूल आणि TRP च्या स्पर्धेत निष्पक्षतेचा बळी.
- पत्रकाराला रोजगारापेक्षा निष्ठेचा मुद्दा महत्त्वाचा.

परिणामी बऱ्याच वेळी पत्रकारिता ही वस्तुनिष्ठ राहिली नाही, तर पक्षनिष्ठ झाली.

अनेक पत्रकार हे थेट राजकारणात प्रवेश करतात. अशात प्रश्न निर्माण होतो- ही पत्रकारितेची व्यासपीठे आहेत की राजकीय 'लॉंचिंगपॅड'? हे दोष एका व्यक्तीचा नाही, ही संपूर्ण व्यवस्थेची समस्या आहे. राजकीय पक्षांना आपला विचार प्रसारित करण्यासाठी पत्रकारांचा वापर, पत्रकारांना सत्तेच्या जवळ जाण्यासाठी माध्यमांचा वापर, या परस्पर अवलंबित्वात 'सत्य' हरवते.

चांगल्या पत्रकारांना. सत्य शोधणाऱ्या, तथ्य मांडणाऱ्या, सत्तेवर प्रश्न करणाऱ्या पत्रकारांना हा कलंक लागतो. त्यांचा प्रामाणिकपणा, त्यांची मेहनत आणि त्यांची प्रतिमा यावर शंका घेतली जाते.

त्यांना राजकीय अजेंडाविरुद्ध लिहायचं की नाही याचाही प्रश्न पडतो. त्यांच्या लेखनाची प्रतिमा, त्यांचा हेतू, त्यांचे ध्येय-सगळे संशयाच्या धूसर धुक्यात हरवते.

लोकशाहीचे पहारेकरी असलेल्या माध्यमांनी जरच सत्ता आणि पक्षांच्या दावणीला स्वतःला बांधून घेतलं, तर लोकांच्या हक्कांची संरक्षण कोण करणार? बातमीचे तर्क, तपास आणि पुरावे यांची जागा जाहिरात, कौतुक आणि दिशादर्शक बातमी घेत असेल तर समाज दिशाभूल होण्याचा धोका निर्माण होतो.

**पत्रकारितेचा धर्म पुन्हा नव्याने ओळखण्याची वेळ**

**प्रश्न एका पक्षाचा नाही. प्रश्न आहे पत्रकारितेच्या प्रामाणिकतेचा. माध्यमांनी पुन्हा एकदा लोकांच्या हिताचे रक्षण करणारे व्यासपीठ व्हायला हवे. सत्तेशी निष्ठा नाही, तर समाजाशी निष्ठा हीच खरी पत्रकारिता आहे. आजही अनेक प्रामाणिक पत्रकार आहेत-ज्यांनी सत्यासाठी लढा दिला, दबावाला न जुमानता सत्तेवर प्रश्न विचारले. अशा पत्रकारांना सलाम! अंतिम प्रश्न - माध्यमे कोणासाठी? सत्तेसाठी की समाजासाठी? उत्तर सोपं आहे, पण ते पाळणं कठीण आहे.**



## खडकवासला-शिव रस्त्याचे अतिक्रमण हटवणे आणि कॉँक्रिटकरण मंजूर

- माजी सरपंच सौरभ मते यांनी केला होता पाठपुरावा

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला–शिव रस्त्याचे अतिक्रमण हटवून संपूर्ण रस्ता कॉँक्रिट करण्याची नागरिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी अखेर मंजूर झाली आहे. या कामासाठी माजी सरपंच सौरभनाना जयसिंग मते यांनी प्रयत्न केले. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे मोठे लवकरच सुरू होणार आहे.

कोल्हेवाडी शिवरस्ता येथे झालेल्या 'राष्ट्रवादी परिवार मिलन' कार्यक्रमात माजी सरपंच सौरभ मते यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासमोर रस्त्याची खराब अवस्था, अतिक्रमण, वाहतूक कोंडी आणि नागरिकांची रोजची गैरसोय याबद्दल स्पष्टपणे सांगितले. त्यांनी पवार यांना या रस्त्याचे तातडीने काम करण्याची विनंती केली आणि अधिकृत निवेदनही दिले. अजितदादांनी ही मागणी सकारात्मकपणे ऐकली आणि जनसंवाद कार्यक्रमात निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. आता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली आहे. खडकवासला–शिव रस्त्यावरील अतिक्रमण हटवणे आणि संपूर्ण रस्ता कॉँक्रिटकरणाचे काम मंजूर झाले आहे. या कामासाठीची सरकारी प्रक्रिया सुरू झाली असून लवकरच प्रत्यक्ष कामही सुरू होणार आहे.

या निर्णयामुळे खडकवासला परिसरातील नागरिकांना सुरक्षित, रुंद आणि चांगल्या दर्जाचा रस्ता मिळणार आहे. वाहतूकही सुरळीत होईल आणि अपघातांचा धोका कमी होईल. "माझ्या पाठपुराव्याला यश मिळाले आणि नागरिकांची जुनी मागणी पूर्ण होत आहे," असे समाधान माजी सरपंच सौरभ मते यांनी व्यक्त केले. या मोठ्या निर्णयामुळे संपूर्ण परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविण्याचे आवाहन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम लवकरच जाहीर होणार असून, आगामी २०२५ मधील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाने उमेदवारांच्या अर्जांना सुरुवात केली असल्याची माहिती पुणे जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीरंग चव्हाण पाटील यांनी दिली. पुणे जिल्ह्यात एकूण १३ तालुके असून, त्यामध्ये जिल्हा परिषद निवडणूक गटांची संख्या ७३ तर पंचायत समिती गणांची संख्या १४६ आहे. या निवडणुका पारदर्शक व लोकशाही पद्धतीने पार पाडण्यासाठी पक्षाकडून व्यापक नियोजन करण्यात येत आहे. कॉंग्रेस पक्ष हा सर्वधर्मसमभाव, सामाजिक सलोखा, स्त्री-पुरुष समानता आणि लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणारा पक्ष असल्याने सर्व समाजघटकातील इच्छुक तरुण, युवक-युवती, महिला आणि निष्ठावंत कॉंग्रेस कार्यकर्त्यांना अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज पुणे जिल्हा कॉंग्रेस कमिटी कार्यालय, कॉंग्रेस भवन, शिवाजीनगर, पुणे- ४११००५ येथे अथवा संबंधित तालुका कॉंग्रेस कमिटी अध्यक्षांकडे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष श्रीरंग चव्हाण पाटील यांनी सांगितले की, "कॉंग्रेस पक्षाची भूमिका सदैव विकासोन्मुख राहिली आहे. स्थानिक स्वराज संस्थांमध्ये सक्षम प्रतिनिधी निवडून येण्यासाठी पक्षाचे दरवाजे सर्वांसाठी खुले आहेत." तसेच पंचायत राज व्यवस्थेमध्ये सर्वसमावेशक व पारदर्शक नेतृत्व उभे राहावे ही अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. कॉंग्रेस पक्षामार्फत हे अर्ज लवकरच छाननी करून पुढील निवडणूक प्रक्रियेसाठी उमेदवारांची निवड केली जाणार आहे.

## धायरी, नऱ्हे तसेच अनेक भागातून उघड्या नाल्यातून वाहते मैला पाणी

*निलेश दमिष्टे यांची भावनिक कैफियत : "नुसते टेंडर पास करू नका, जनतेचं आयुष्यही बघा!"*

**धायरी, नऱ्हे तसेच महापालिकेतील नव्याने समाविष्ट गावे**



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

रोजच्या आयुष्यात शांततेने जगावं, मुलांनी स्वच्छ हवेत खेळावं, वृद्धांनी निर्धास्त फिरावं... हे प्रत्येक कुटुंबाचं स्वप्न असतं. पण धायरी, नऱ्हे, अथवा सगळ्या नव्याने समाविष्ट गावात उघड्या नाल्यातून सतत वाहत असलेलं मैला पाणी हे स्वप्न मोडत आहे. दुर्गंधी, डास, घाण, यामुळे अगदी अतिसार डेंग्यू मलेरिया अश्या आजारांचा वाढता धोका यामुळे नागरिकांचं जगणंच त्रासदायक झालं आहे.

ही भयंकर परिस्थिती पाहून सामाजिक कार्यकर्ते निलेश दमिष्टे यांनी दुःखाने आणि संतापाने प्रशासनाला धडक शब्दांत सांगितले—

इथे लोक जगत आहेत, मुलं वाढत आहेत, वृद्ध श्वास घेत आहेत. जनतेचं आयुष्य पहा, कागदावरची कामं नाही."

ते पुढे म्हणाले— "आपण भरलेला टॅक्स हा आपलं जीवन सुधारण्यासाठी आहे. पण नाले उघडेच, निचरा नाही, घाण तशीच...

ही परिस्थिती पाहून कोणताही नागरिक अस्वस्थ होईल. हे आमचं धायरी आहे, आमचा आयुष्याचा अविभाज्या घटक आहे. आमचा प्रभाग आहे. इथं कोणत्याही नागरिकाला आजारी पडू देणं योग्य नाही." नाले तात्काळ योग्य निचऱ्याची व्यवस्था करून नैसर्गिक व स्वच्छ पाणी वाहताना दिसलें पाहिजे अशी मागणी करत दमिष्टे म्हणाले—

"लोकांच्या आरोग्यापेक्षा मोठी गोष्ट नाही. हा प्रश्न कागदावर नको, जमिनीवर सोडवा. धायरीच्या लोकांचं आयुष्य त्वरित हलकं-फुलकं, स्वच्छ आणि सुरक्षित करा... एवढीच प्रामाणिक आणि नम्र विनंती."

या गंभीर प्रश्नावर पुणे महानगरपालिका आता तरी लक्ष देऊन काम करणार का? असा प्रश्न निर्माण होत आहे.

## भाजप महिला उपाध्यक्षपदी सौ. सविता रमेश गायकवाड यांची निवड



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीच्या महिला आघाडीत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला असून सौ. सविता रमेशबापू गायकवाड यांची भाजप महिला उपाध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. भाजपाच्या खडकवासला विधानसभा महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. मनीषाताई मोरे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. आमदार भिमराव तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड पार पडली.

या नियुक्तीनंतर सौ. सविता गायकवाड यांनी पक्षाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. "खडकवासला मतदारसंघातील महिलांचे प्रश्न, त्यांच्या सुरक्षेपासून ते सक्षमीकरणापर्यंत प्रत्येक मुद्द्यावर संवेदनशीलपणे काम करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. पक्षाची वाढ व संघटनेचे बळ वाढवण्यासाठी मी पूर्ण ताकदीने काम करेन," असे त्यांनी सांगितले.

सविता गायकवाड या भाजप ओबीसी शहर उपाध्यक्ष रमेशबापू गायकवाड यांच्या पत्नी असून दोघेही सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय आहेत. त्यामुळे त्यांच्या नियुक्तीचे स्वागत केवळ पक्षातील कार्यकर्त्यांनीच नव्हे, तर स्थानिक नागरिकांनीही उत्साहाने केले आहे.

खडकवासला परिसरात महिला आघाडी आणखी मजबूत होण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, महिलांना नेतृत्वाच्या पुढील संधी मिळाव्यात यासाठी सविता गायकवाड यांचे योगदान महत्त्वाचे ठरेल, अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. त्यांच्या निवडीमुळे भाजप महिला आघाडीला नवे बळ मिळेल आणि आगामी काळात पक्ष संघटनात्मकदृष्ट्या अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. सौ.सविता गायकवाड यांच्या नेतृत्वामुळे खडकवासला विधानसभा मतदारसंघात आणखी नवी दिशा मिळेल असा विश्वास व्यक्त केला आहे.



## उरुळी कांचनमध्ये चाकू हल्ला; आरोपीची गावातून धिंड

**उरुळी कांचन - विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

उरुळी कांचन (ता. हवेली) : तुपेवस्ती परिसरात दुकानदारावर झालेल्या चाकू हल्ल्याप्रकरणी उरुळी कांचन पोलिसांनी शनिवारी (२९ नोव्हेंबर) आरोपी स्वप्निल बाळू ओव्हाळ (रा. तुपेवस्ती) याची गावातून धिंड काढत कडक कारवाई केली. गुन्हेगारीला पाठीशी घालणाऱ्या कोणत्याही दादागिरीला पोलिस झुकत नाहीत, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला. २५ नोव्हेंबर रोजी किरकोळ वादातून दुकानदार प्रभाकर तुपे (वय ५५) यांच्यावर धारदार चाकूने तीन ते चार वार करण्यात आले होते. आरोपीला अटक केल्यानंतर शनिवारी मोठ्या बंदोबस्तात त्याला प्रथम हल्ल्याच्या ठिकाणी नेण्यात आले. नागरिकांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली.

# सासवड-पुरंदर-फुरसुंगी नगरपंचायतीचा राजकीय रंगतदार सामना

**शिंदे गट विरुद्ध भाजप नेते; विजय शिवतारे यांचा संजय जगतापांवर हल्लाबोल**



**सासवड (दै. आरंभ पर्व)**

सासवड, पुरंदर आणि फुरसुंगी नगरपंचायतीच्या निवडणुकीची रणधुमाळी चांगलीच तापली आहे. स्थानिक पातळीवर विकास, गटबाजी, नेतृत्व आणि तिकीटवाटप या मुद्द्यांवरून पक्षांमध्ये आधीच पारा चढलेला असताना आता शिवसेना शिंदे गट आणि भाजप नेत्यांमध्ये आरोप–प्रत्यारोपांचा जोरदार फटाका फोडला गेला आहे.

यातच शिवसेना शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री विजय शिवतारे यांनी माजी आमदार संजय जगताप यांच्यावर थेट शब्दबाण सोडले आहेत. यामुळे निवडणुकीच्या तोंडावर परिसरातील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे.

पत्रकारांशी बोलताना विजय शिवतारे म्हणाले की, "पुरंदर तालुक्यात मागील अनेक वर्षांपासून विकासाचा गाडा अडकून पडलेला होता. नागरिकांसाठी ठोस काम करण्याऐवजी काही जणांनी केवळ सत्ता आणि स्वतःचा हितसंबंध यांना प्राधान्य दिलं. संजय जगताप यांनीच विकास रोखला आणि लोकांना दिशाभूल केली."

शिवतारे यांच्या या टीकेवरून शिवसेना शिंदे गट हे निवडणुकीच्या तोंडावर आक्रमक भूमिकेत गेल्याचं स्पष्ट होत आहे.

या निवडणुकीत भाजप आणि शिवसेना शिंदे गट एकत्र येऊन लढणार असल्याचं चित्र असलं तरी तळागाळात मात्र दोन्ही पक्षांत जबरदस्त तणावाची स्थिती असल्याचे संकेत मिळत आहेत. काही भाजप नेतेही संजय जगताप यांच्या बाजूने असल्याचं बोललं जात आहे.

या सगळ्या घडामोडींनी या तिन्ही नगरपंचायत्यांच्या नागरिकांमध्येही चर्चांना उधाण आलं आहे. "विकासाचा मुद्दा सर्वात महत्त्वाचा. राजकीय भांडणात आमच्या मागण्या आणि समस्या विसरल्या जाऊ नयेत," अशी प्रतिक्रिया मतदारांकडून व्यक्त होत आहे.

**जगतापांच्या गोट्यातूनही उत्तराची तयारी**

**विजय शिवतारे यांच्या टीकेनंतर जगताप गटातही हालचाल सुरू झाली असून, लवकरच यावर उत्तर देणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. राजकीय वातावरण तापू लागल्याने आगामी काही दिवसांत आणखी आरोप-प्रत्यारोपांची धुरळा उडण्याची शक्यता आहे.**